नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २६३ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### मराठा आरक्षणासाठी तरुणाची आत्महत्या

मुंबई : (स. गांवकरी) : मराठा आरक्षणासाठी लातूरमध्ये एकाने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली असल्याचा दावा करत नागरिकांनी शिरुर अंतपाळ तालुक्यातील सुमराठा येथे रस्तारोको केला. मृत व्यक्तीचे नाव सुनील विनायक बिराजदार असे असून 'मराठा समाजाच्या आरक्षणासाठी माझे जीवन संपवत आहे' अशी त्याने लहिली आहे. मंगळवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी विहिरीत शोध घेतला आणि मृतदेह बाहेर काढण्यात आला. या घटनेनंतर संतप्त कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली. मोड येथे उदगीर-लातूर महामार्गावर मृतदेह ठेवून चक्काजाम आंदोलन सुरू करण्यात आले. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली असून दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. आंदोलकांनी प्रशासनासमोर दोन प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत.

### चाकरमान्यांना मोठा दिलासा

मुंबई : (स. गांवकरी) : ठाणे छ मुंबई, ठाणे आणि पुणे परिसरातून दरवर्षी मोठ्या संख्येने चाकरमानी गणेशोत्सवासाठी आपल्या गावाकडे, कोकणात जातात. गणेशोत्सवाच्या काळात कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांची मोठी वर्दळ होत असल्याने या प्रवासादरम्यान चाकरमान्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ११ सप्टेंबर २०२६ ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना पथकरातून (टोल) सूट देण्यात येणार आहे. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत परिपत्रक जारी केले असून, या निर्णयामुळे गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुलभ आणि किफायतशीर होणार आहे. मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्ग (NH-48), मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग (NH-66), सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील कोकणाकडे जाणारे मार्ग आणि अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू मार्गावरील पथकर नाक्यांवर ही पथकरमाफी लागू राहणार आहे.

### घरातच ओलीस ठेवत ६८ लाखांचा गंडा!

मुंबई : (स. गांवकरी) : ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या सायबर गुन्हेगारांचं जाळं दिवसेंदिवस अधिकच घातक बनत चालले आहे. पुण्यातील खेड तालुक्यातून असाच एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. "मी विश्वास नांगरे पाटील बोलतोय," अशी खोटी ओळख सांगून सायबर भामट्यांनी एका ७४ वर्षीय निवृत्त महिला शिक्षिकेला आणि त्यांच्या पतीला तब्बल महिनाभर 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली घरातच ओलीस ठेवलं. अटकेची भीती दाखवून या दाम्पत्याची तब्बल ६८ लाख ८० हजार रुपयांची जीवनभराची जमापुंजी लुटल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. २९ जुलै रोजी या पीडित महिला शिक्षिकेला एका अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉल आला. समोरील व्यक्तीने अंगावर पोलिसांचा गणवेश परिधान केला होता. मुंबईतील वरळी पोलिस ठाण्यातून 'सब-इन्स्पेक्टर संदीप राव' बोलत असल्याचे सांगत त्याने थेट भीती दाखवण्यास सुरुवात केली. "तुमच्या खात्यावरून २ कोटी रुपयांचे बेकायदेशीर व्यवहार झाले असून तुमच्यावर गुन्हा दाखल होत आहे," असा बनाव भामट्याने रचला. पीडित महिलेने असे कोणतेही बँक खाते किंवा व्यवहार नसल्याचे ठणकावून सांगितले.

# मनोज जरांगेंचा सरकारवर संताप

## "फडणवीसांनी विखेंना मराठा समाजाचं काम करू दिलं नाही"







मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांचे उपोषण सुरू आहे. काहीही झालं तरी सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय मी माझे उपोषण मागे घेणार नाही, असा ठाम पवित्रा जरांगे पाटील यांनी घेतला आहे. अशातच गेल्या काही काळापासून ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करत आहेत. शिंदे यांना टार्गेट केल्यामुळे शिवसेनेचे नेते मात्र चांगलेच आक्रमक झाले आहेत. मंत्री भरत गोगावले यांनी तर जरांगे यांना थेट इशारा दिला होता. आमच्या नेत्याला लक्ष्य केलं जात असेल तर आम्ही गप्प बसणार नाही असं गोगावले यांनी म्हटले होते. याला आता जरांगे पाटलांनी उत्तर दिले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले की, 'मी तयार आहे कधीही सज्ज आहे, तुम्ही दुसऱ्यासाठी शेठ आहेत. माझ्या नादाला लागायचं नाही. माझ्याकडे पुरावा आहे. मीडियात पुरावा देईन मी शिंदेंवर बोलणार आहे. तुम्ही मराठ्यांचे संसार उध्वस्त करणाऱ्यांच्या बाजूने बोलू नका. मग तुमच्यापेक्षा तटकरे बरा म्हणावं लागेल. होऊ दे काय व्हायचं ते.

मुंबई : (स. गांवकरी)

मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटीत पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसले असून आजचा उपोषणाचा ११ वा दिवस आहे. आज त्यांनी थेट मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर तोफ डागली. तसंच, यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली.

"राधाकृष्ण विखे पाटील मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष झाल्यानंतर मराठा समाजाला नेता मिळाला असल्याचं वाटलं. ते समाजाचं कल्याण करतील असं वाटलेलं. पण त्यांनी आपल्याला पुरात नेलं आणि तिथे सोडून ते परत मागे आलेत", अशी टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली.

"सरकारला समजून घ्यायला, बाप आहे का आमचा? राधाकृष्ण विखे पाटील हे सर्वांत जास्त निष्क्रिय अध्यक्ष आहेत. त्यांनी मराठा समाजावर हल्ल्याचं नियोजन केलं. उपसमितीचं अध्यक्ष पदही हवं, बोलल्यावर रागही येतो. तुम्ही फक्त हल्ला करा, तुम्हाला उभं राहायलाही जागा राहणार नाही", असा इशाराही त्यांनी दिला. "आम्ही एक पाऊल पुढे यायचं म्हणजे काय? मराठ्यांचं वाटोळं करून बसला आहात. आता तुम्हाला सुट्टी नाही. हे काम करताना सत्तेचा आनंद घ्यावा लागतो, तेव्हा अपमान पचवण्याची ताकद असली पाहिजे. देवेंद्र फडणवीस मराठ्यांचं काम करू देत नाहीत.

# लिंगनिदान रोखण्यासाठी आता राज्यस्तरीय विशेष पथक

मुंबई : (स. गांवकरी)

स्त्रीभ्रूणहत्या आणि बेकायदा गर्भपाताला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने जिल्हास्तरीय यंत्रणेवर अवलंबून न राहता राज्यस्तरीय विशेष कृती दल स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या पथकाकडून जिल्हे आणि महानगरपालिकांना प्रत्यक्ष भेटी देऊन सोनोग्राफी केंद्रे, वैद्यकीय गर्भपात केंद्रांची (एमटीपी) अचानक तपासणी केली जाणार आहे. कायद्याचे उल्लंघन आढळल्यास तत्काळ कायदेशीर कारवाईच्या सूचना दिल्या जातील. विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली हे पथक कार्यरत राहील. गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ (पीसीपीएनडीटी) आणि वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१ (एमटीपी) यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, स्त्रीभ्रूणहत्या थांबवणे, बेकायदा गर्भपाताला आळा घालणे आणि जन्मतः लिंग गुणोत्तरात सुधारणा करणे ही या पथकाच्या स्थापनेमागील प्रमुख उद्दिष्टे आहेत. राज्यात या दोन्ही कायद्यांच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास येत असल्याने सोनोग्राफी आणि तत्सम केंद्रांवर तसेच एमटीपी केंद्रांवर विविध विभागांच्या समन्वयातून प्रभावी देखरेख आणि तपासणी आवश्यक असल्याचे सरकारने म्हटले आहे. विधान परिषदेच्या सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली हे पथक काम करणार आहे. विधान परिषद सदस्य प्रज्ञा सातव, भावना गवळी, चित्रा वाघ, उमा खापरे, डॉ. मनीषा कायंदे तसेच विधानसभेच्या स्नेहा-दुबे पंडित आणि श्वेता महाले यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे हे सदस्य सचिव असतील. पथकाला जिल्हे आणि महानगरपालिकांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील पीसीपीएनडीटीच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी किंवा महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या समन्वयाने सोनोग्राफी केंद्रे आणि एमटीपी केंद्रांची अचानक तपासणी केली जाणार आहे. कायद्याचा भंग आढळल्यास संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याला तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना पथक देऊ शकते.

■ सोनोग्रोफी, एमटीपी केंद्रांवर अचानक तपासणी, तीन महिन्यांनी सरकारला अहवाल





# अकोल्यात रानभाज्यांची मांदियाळी

अकोले : (स. गांवकरी)

जैवविविधतेने समृद्ध असणाऱ्या निसर्गसंपन्न अकोले तालुक्यात रानभाज्याही विपुल प्रमाणात आढळतात. हा निसर्ग ठेवा जपला पाहिजे, असे सांगतानाच या रानभाज्यांची मात्र बऱ्याच जणांना माहिती नसते. नागरिकांनी पौष्टिक आणि आरोग्यदायी रानभाज्यांचा आहारात समावेश करावा. रानभाजी घेताना ती कशी बनवायची, तिचे गुणधर्म काय आहेत, त्याची माहितीही करून घ्यावी. रानभाज्यांच्या विविध पाककृती शिका, असे आवाहन आमदार डॉ.किरण लहामटे यांनी केले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (राजूर)व सोबती फाउंडेशनने "उत्सव रानभाज्यांचा" या प्रदर्शनाचे आयोजन केले होते. त्याचे उद्घाटन डॉ. लहामटे यांच्या हस्ते झाले. सोबती फाउंडेशनच्या अध्यक्ष पुष्पा लहामटे, नगरपंचायत मुख्याधिकारी धनश्री पवार, सहायक प्रकल्पाधिकारी योगेश ढोणे, विनय सावंत, अक्षय आभाळे आदी उपस्थित होते.

# अभिजीत दिपकेंसह दास, रांकावर २ कोटींचा मानहानीचा खटला दाखल




मुंबई : (स. गांवकरी)

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील गौरव भाटिया यांनी 'कॉक्रोच जनता पार्टी' आणि त्यांच्या प्रमुख नेत्यांविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात तब्बल २ कोटी रुपयांचा मानहानीचा खटला दाखल केला आहे. सोशल मीडियावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तयार करण्यात आलेल्या एका बनावट ग्राफिक्सद्वारे आपली बदनामी केल्याचा गंभीर आरोप भाटिया यांनी केला आहे. या संदर्भातील वृत्त 'बार अँड बेंच' या वृत्तसंस्थेने दिले आहे.

या प्रकरणात सीजेपीचे नेते अभिजीत दिपके, सौरव दास आणि आशुतोष रांका यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. दिल्ली उच्च न्यायालयात २ कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईसह या नेत्यांवर कोणतीही बदनामीकारक सामग्री पोस्ट करण्यास बंदी घालण्याची मागणी गौरव भाटिया यांनी केली आहे. हे संपूर्ण प्रकरण सोशल मीडियावरील एका एआय-जनरेटेड पोस्टशी संबंधित आहे. सीजेपीच्या दिल्लीतील आंदोलनादरम्यान निशू आझाद हिच्या वडिलांवर झालेल्या हल्ला प्रकरणात स्वतंत्र भारद्वाज हा आरोपी आहे. सीजेपी नेते सौरव दास यांनी आपल्या एक्स (X) खात्यावरून एक एआय-निर्मित पोस्टर शेअर केले होते. या पोस्टरमध्ये गौरव भाटिया यांनी स्वतंत्र भारद्वाज यांना "दिमागी नक्षल" (वैचारिक नक्षलवादी) म्हटल्याचा खोटा दावा करण्यात आला होता.

हे विधान आपण कधीही केले नसल्याचे स्पष्ट करत गौरव भाटिया यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी सौरव दास यांना संबंधित पोस्ट हटवण्यासाठी आणि २४ तासांच्या आत बिनशर्त माफी मागण्यासाठी इशारा दिला होता.

भाटिया यांच्या इशाऱ्यानंतर सौरव दास यांनी ती पोस्ट डिलीट केली खरी, परंतु ही इमेज एआयने तयार केल्याचे स्पष्टीकरण देत त्यांनी भाटिया यांनाच "तुम्ही एआयने केलेल्या या विधानाशी असहमती दर्शवता का?" असा उलट प्रश्न विचारला.

दरम्यान, सीजेपीचे सह-संयोजक आशुतोष रांका यांनी सौरव दास यांची हीच विवादित पोस्ट आपल्या एक्स अकाउंटवरून रीपोस्ट केली आणि भाजप नेत्यांची टिंगल उडवणारे कॅप्शन लिहिले. यापूर्वी रांका यांनी सीजेपीच्या इतर सहकाऱ्यांसह स्वतंत्र भारद्वाज यांच्यावर कारवाईची मागणी लावून धरली होती.

### "सोशल मीडिया ट्रायल नाही, कोर्टातच सत्याचा निकाल"

या प्रकरणी गौरव भाटिया यांनी आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून न्यायालयात धाव घेतल्याची माहिती दिली. "जेव्हा आरोप आपल्या सीमा ओलांडतात, तेव्हा कायदा स्वतःची रेषा आखतो. आता कोणताही सोशल मीडिया ट्रायलची लढाई होणार नाही; फक्त तथ्य, पुरावे आणि कायद्याचे राज्य असेल. सत्याची परीक्षा कोर्टातच होईल," असा इशारा भाटिया यांनी दिला आहे.

# राज्यातील खरीप हंगाम धोक्यात

## १९ जिल्ह्यांतील ८३ तालुक्यांमध्ये २० दिवसांहून जास्त पावसाचा खंड



मुंबई : (स. गांवकरी)

पावसाअभावी राज्यातील खरीप हंगाम अडचणीत आला आहे. ऑगस्ट मध्यापासून आजपर्यंत राज्यातील १९ जिल्ह्यांतील ८३ तालुक्यांमध्ये २० दिवसांपेक्षा जास्त दिवस पावसाचा खंड पडला आहे. त्यापैकी उत्तर महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांत ३१ दिवसांपासून जास्त दिवस पावसाने दडी मारली आहे. पुणे जिल्ह्यातील शिरूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथे सर्वाधिक ३८ दिवसांचा सलग पावसाचा खंड नोंदविण्यात आला आहे. पावसाने दडी मारलेल्या भागातील खरीप वाया जाण्याच्या मार्गावर आहे.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत राज्यातील १९ जिल्ह्यांतील ८३ तालुक्यांमध्ये पावसाचा दीर्घकालीन खंड नोंदविण्यात आला आहे. यापैकी २३ तालुक्यांमध्ये ३० दिवसांपेक्षा अधिक, तर १८ तालुक्यांमध्ये २५ ते ३० दिवसांचा पावसाचा खंड पडला आहे. उर्वरित ४२ तालुक्यांमध्ये २० ते २५ दिवसांचा पावसाचा खंड पडला आहे. पुणे जिल्ह्यातील शिरूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथे सर्वाधिक ३८ दिवसांचा सलग पावसाचा खंड पडला आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागात पावसाचा दीर्घ खंड पडल्यामुळे संबंधित भागातील पिके हातची गेली आहेत. विभागनिहाय पाहता, पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सातारा आणि सांगली या चार जिल्ह्यांतील १५ तालुके दीर्घ पावसाच्या खंडाच्या यादीत आहेत. यापैकी १२ तालुक्यांत ३० दिवसांपेक्षा अधिक खंडाची नोंद झाली आहे. पुणे जिल्ह्यातील बारामती, दौंड, पुरंदर, शिरूर आणि इंदापूर, सातारा जिल्ह्यातील माण व फलटण, सांगलीतील आटपाडी तसेच सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस, सांगोला, बार्शी आणि मोहोळ या भागांना पावसाच्या मोठ्या खंडाचा फटका बसला आहे. बारामती, दौंड, पुरंदर, फलटण, माण आणि आटपाडी येथे ३७ दिवसांचा सलग खंड नोंदविला गेला आहे. इंदापूर व माळशिरस येथे ३४ दिवस, सांगोला येथे ३३ दिवस, तर बार्शी आणि मोहोळ येथे ३१ दिवसांचा खंड पडला. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, अहिल्यानगर, नाशिक आणि धुळे या चार जिल्ह्यांतील ३१ तालुके या अहवालात समाविष्ट आहेत. यापैकी १३ तालुक्यांत २० ते २५ दिवस, ११ तालुक्यांत २५ ते ३० दिवस आणि सात तालुक्यांत ३० दिवसांपेक्षा अधिक पावसाचा खंड नोंदविण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव आणि येवला येथे ३७ दिवसांचा, तर कळवण व देवळाली येथे ३५ दिवसांचा खंड राहिला. अहिल्यानगरमधील संगमनेर येथे ३५ दिवस, शेवगाव येथे ३४ दिवस, तर कर्जत येथे सर्वाधिक ३८ दिवसांचा खंड नोंदविण्यात आला. जळगाव जिल्ह्यातील अमळनेर, भुसावळ, मुक्ताईनगर, एरंडोल, रावेर आणि यावल येथे प्रत्येकी २६ दिवसांचा पावसाचा खंड नोंदविण्यात आला आहे. धुळे आणि शिंदखेडा येथेही २६ दिवसांचा खंड आहे. मराठवाड्यातील बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, परभणी आणि जालना या पाच जिल्ह्यांतील १७ तालुक्यांमध्ये दीर्घ पावसाचा खंड नोंदविण्यात आला. त्यापैकी आठ तालुक्यांत २० ते २५ दिवस, सहा तालुक्यांत २५ ते ३० दिवस आणि तीन तालुक्यांत ३० दिवसांपेक्षा अधिक खंड राहिला. बीडमधील गेवराई येथे ३४ दिवसांचा खंड नोंदविण्यात आला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण आणि धाराशिवमधील परांडा येथेही ३४ दिवसांचा सलग खंड राहिला. परळी येथे ३० दिवस, मानवत येथे ३० दिवस, आष्टी येथे २९ दिवस आणि धारूर येथे २५ दिवसांचा खंड पडला आहे.

# शिवनेरी परिसरातील कबर, दर्ग्यांची वस्तुनिष्ठ ऐतिहासिक पडताळणी

## आशिष शेलार यांचे निर्देश, अनधिकृत बांधकामांवर सात दिवसांत कार्यवाही



मुंबई : (स. गांवकरी)

छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेल्या शिवनेरी किल्ला परिसरातील कबर, दर्गे आणि अन्य संरचना नेमक्या कोणत्या कालखंडातील आहेत, याची वस्तुनिष्ठ पडताळणी करण्यात येणार आहे. महसूल अभिलेख, उपलब्ध ऐतिहासिक दस्तावेज तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल तयार करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी मंगळवारी दिले. तसेच, शिवनेरी किल्ल्याचे ऐतिहासिक व जागतिक वारसा मूल्य लक्षात घेता किल्ला परिसरातील संरक्षित क्षेत्रात (बफर झोन) अनधिकृत बांधकामे, कबर व दर्ग्यांसह अन्य संरचनांबाबत तातडीने वस्तुनिष्ठ तपासणी करून कार्यवाही केली जाणार आहे. शिवनेरी किल्ला व परिसरातील स्थितीबाबत अॅड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे (एएसआय) अधिकारी, पुरातत्त्व विभाग, तहसीलदार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांची आढावा बैठक झाली. किल्ला परिसरातील कबर, दर्गा तसेच इतर संरचना नेमक्या कोणत्या कालखंडात निर्माण झाल्या. या संरचना पूर्वीपासून अस्तित्वात होत्या की अलीकडच्या काळात निर्माण करण्यात आल्या, याची निश्चित पडताळणी करण्याच्या सूचना मंत्री शेलार यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शिवनेरी परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित संरचना जागतिक वारसा स्थळाच्या संरक्षित क्षेत्राच्या नियमांचे उल्लंघन करतात का, याबाबत अहवाल सादर केला जाईल. शिवनेरी किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी निगडित असलेला अत्यंत महत्त्वाचा वारसा असून, त्याचे पुरातत्त्वीय आणि जागतिक वारसा मूल्य अबाधित ठेवणे ही सर्व संबंधित यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## स्वारातीम विद्यापीठात राजे उमाजी नाईक जयंती साजरी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे आज सोमवार, दि.०७ सप्टेंबर, २०२६ रोजी राजे उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ.एम.के. पाटील, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. निलेश देशमुख, आयक्यूएसीचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, उपकुलसचिव रवि मोहारीर, रामदास पेद्देवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## राष्ट्रीय लोकशाही आदलातीचे 12 सप्टेंबर रोजी आयोजन



नवीन नांदेड (स. गांवकरी) : नावा मनपाच्या वतीने थकबाकी मालमत्ता धारक यांच्या साठी एक दिवसीय जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड, जिल्हा न्यायालय नांदेड यांच्या वतीने 12 सप्टेंबर रोजी नावा मनपा मुख्यालय येथे राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आले आहे असुन थकबाकी मालमत्ता धारकांना शास्तीवर 80/टक्के सुट देण्यात येणार असून जे थकबाकीदार मालमत्ता कर भरनार नाहीत त्यांच्यावर जप्ती कार्यवाही करण्यात येणार आहे, यासाठी मालमत्ता धारकांनी जप्ती कार्यवाही टाळण्यासाठी मालमत्ता कर भरून सहकार्य करण्याचे आवाहन सिडको क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी केले आहे. सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जवळपास 3829 थकबाकी मालमत्ता धारकांना मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम,यांच्या मार्गदर्शना खाली उपायुक्त अजितपाल संधु,सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या अधिपत्याखाली कार्यालय अधीक्षक विलास गजभारे,वरीष्ठ लिपीक ,मिना अडबलवार, मोहन लांडगे,कर निरीक्षक संजय नागापूरकर,वसंत कल्याणकर, नारायण आठवले,मारोती सारंग, लिपीक सादुला खॉन, मालु एनफळे ,प्रकाश दर्शने,रमेश यशवंतकर, ऊतम जौधंळे, राहुल पाईकराव,दिपक जोंधळे,रविंद्र पोवळे,यांच्या सह लिपीक यांना थकबाकी मालमत्ता धारक व पाणीपट्टी थकबाकी नोटीसा 3829 मालमत्ता धारकांना वाटप केल्या आहेत, जे थकबाकीदार मालमत्ता कर भरणार नाहीत, त्यांची मालमत्ता जप्त करण्यात येणार असल्याचे सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी सांगितले.

## एटीकेटी, एफ- एटीकेटी विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सिबिसीएस पॅटर्नच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील एटीकेटी, एफ- एटीकेटी तसेच पदव्युत्तर द्वितीय वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत महत्त्वपूर्ण सूचना जारी केली आहे. विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या दि.४ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार, संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षा अर्ज ऑनलाइन भरण्याची प्रक्रिया ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावयाची असून, भरलेले अर्ज १ ऑक्टोबर, २०२६ रोजी विद्यापीठात सादर करावयाचे आहेत. संबंधित विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे विद्यापीठाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येणार असून, संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षा ३१ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत घेण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षेनंतर उत्तरपत्रिकांची तपासणी करून गुणयादी व उत्तरपत्रिका विद्यापीठाच्या केंद्रीय मूल्यमापन केंद्रात १६ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत सादर करावयाच्या आहेत. तसेच, प्रात्यक्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या संबंधित विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत परीक्षा अर्ज भरून परीक्षा प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

## स्वारातीम विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलात शिक्षक दिन उत्साहात साजरा

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलात शिक्षक दिन अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी एकत्र येत आपल्या प्राध्यापकांच्या कष्टांबद्दल, मार्गदर्शनाबद्दल आणि प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली पक्षाची संघटनात्मक बांधणी करा

## भाजपाच्या जिल्हा कार्यकारिणी बैठकीत खासदार डॉ. अजित गोपछडे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

भारतीय जनता पार्टी हा शिस्त आणि संस्कारांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये जिल्हाध्यक्षांना महत्त्वाचे स्थान असून, कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्षांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून पक्षाची ताकद वाढवावी, असे आवाहन राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केले.




भाजपा नांदेड दक्षिण जिल्हा कार्यकारिणीची बैठक सोमवारी पार पडली. यावेळी ते बोलत होते.

बैठकीस प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य बापू देशमुख, प्रदेश सचिव तथा नांदेड जिल्हा प्रभारी रेखाताई कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, माजी प्रदेश सचिव देविदास राठोड, प्रदेश सदस्य राजेश कुंटूरकर, बालाजी बच्चेवार, सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, माणिकराव लोहगावे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अनिताताई चोंडीकर, आदी उपस्थित होते.

प्रारंभी सेवा सप्ताहानिमित्त माणिकराव लोहगावे यांनी माहिती दिली. महाराष्ट्र सरकारने केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव विजय धोंडगे यांनी मांडला. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि भारताचे पंतप्रधान म्हणून 25 वर्षाचा कार्यकाल पूर्ण केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा राजकीय प्रवास अनिल पाटील खानापूरकर यांनी मांडला. समरसता अभियानाची माहिती प्राचार्य मनोहर पवार यांनी सादर केली.

यावेळी बैठकीला मार्गदर्शन खा. डॉ. गोपछडे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा सर्वांगीण विकास होत असून, महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विविध शासकीय योजना तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू आहे. सरकारच्या योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करावी.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी जो कार्यकर्ता अधिक वेळ देईल, त्याचा पक्ष निश्चितपणे विचार करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नांदेड दक्षिण ग्रामीण भागात जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक बांधणीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली अधिक सक्रियपणे काम करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपाची सत्ता स्थापन करण्यासाठी आतापासूनच तयारीला लागावे, असे आवाहन डॉ. गोपछडे यांनी केले.

बैठकीचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन गंगाप्रसाद यन्नावार यांनी केले तर आभार उत्तम चव्हाण यांनी मानले.

याप्रसंगी जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते प्रदेश भाजपाचे माजी सदस्य जिल्हा पदाधिकारी जिल्हा मोर्चा अध्यक्ष मंडळ अध्यक्ष विविध सेलचे जिल्हा संयोजक विधानसभा प्रमुख बीएलए-1, सोशल मीडियाचे मंडळाचे संयोजक आदी उपस्थित होते

## आषाढी पौर्णिमेपासून तीन महिन्यांच्या वर्षावासाला प्रारंभ

भोकर : (स. गांवकरी)

- भोकर तालुक्यात बुद्धविहारांमध्ये धम्मग्रंथ वाचनासह विविध उपक्रम

जगभरात आषाढी पौर्णिमा आनंदोत्सव आणि आध्यात्मिक महत्त्वाचा दिवस म्हणून साजरी केली जाते. भगवान बुद्धांनी मानवाला अविद्या आणि अज्ञानाच्या अंधकारातून मुक्त करून प्रज्ञेच्या प्रकाशाकडे नेणाऱ्या धम्माची शिकवण दिली. याच पार्श्वभूमीवर आषाढ पौर्णिमेपासून बौद्ध धम्मातील पवित्र तीन महिन्यांच्या वर्षावासाला सुरुवात होते. हा काळ केवळ पावसाळ्यात निवास करण्याचा नसून, अशुद्ध मनाची शुद्धता, मनातील मलीनता दूर करण्याचा आणि मैत्रीभाव वृद्धिंगत करण्याचा काळ मानला जातो. बौद्ध धम्मामध्ये आषाढ पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. तथागत गौतम बुद्धांच्या जीवनातील अनेक महत्त्वपूर्ण घटना या दिवसाशी जोडल्या गेल्या आहेत. याच दिवशी महामाया यांना गर्भधारणा झाली, तसेच सारनाथ येथे भगवान बुद्धांनी पहिले धम्मचक्र प्रवर्तन करून आपल्या पाच शिष्यांना प्रथम धम्मोपदेश दिला. या शिष्यांनी बुद्धांना गुरु मानल्यामुळे आषाढ पौर्णिमेला 'गुरुपौर्णिमा' असेही संबोधले जाते. याच दिवशी भिक्खू संघाची स्थापना झाल्याचेही बौद्ध परंपरेत मानले जाते. 'वर्षा' म्हणजे पाऊस आणि 'वास' म्हणजे निवास.

पावसाळ्याच्या तीन महिन्यांत भिक्खूंनी एका ठिकाणी राहून धम्माचा अभ्यास, साधना आणि उपासक-उपासिकांना धम्मोपदेश करावा, ही वर्षावासाची प्राचीन परंपरा बुद्धकाळापासून चालत आली आहे. पावसाळ्यातील प्रवासामुळे होणारा त्रास तसेच लहान जीव-जंतूंना इजा होऊ नये, यासाठी भिक्खू एका ठिकाणी अधिष्ठान करीत असत.

## राष्ट्रीय एकता पदयात्रा व भव्य वॉकेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

मुखेड : (स. गांवकरी)

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेच्या ४ थ्या वर्षपुर्तीनिमित्त मुखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने राष्ट्रीय एकता पदयात्रा व 'मुखेड वॉकेथॉन' स्पर्धेला युवक, महिला, विद्यार्थी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रीय एकता, सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारत जोडो यात्रा दि. ७ सप्टेंबर २०२२ रोजी सुरू होऊन ३० जानेवारी २०२३ रोजी पूर्ण झाली. या यात्रेच्या माध्यमातून देशातील विविधता, एकता, सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात आला. त्याच विचारांना पुढे नेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा भारत यात्री डॉ. श्रावण रॅपनवाड यांच्या संकल्पनेतून भारत जोडो यात्रा दिनानिमित्त मुखेड शहरात राष्ट्रीय एकता पदयात्रा व वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले.



यात राजे छत्रपती अकॅडमीचे संचालक माजी सैनिक ज्ञानेश्वर पाटील डुमणे, यांनि विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार हनमंत पाटील बेटमोगरेकर, रामदास पाटील सुमठाणकर व मराठवाडा भूषण डॉ. दिलीप पुंडे, डॉ.रामराव श्रीरामे, यांच्या हस्ते करण्यात आले. मुखेड शहरातील संजीवनी सकाळ समूह, जय श्रीराम आरोग्यदायी मंडळ, जिप्सी मॉर्निंग ग्रुप, सुप्रभात मित्र मंडळ यांच्यासह विविध सामाजिक संघटना, मंडळांचे पदाधिकारी, युवक, महिला, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

त्यामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास ५,५५५ रुपये, द्वितीय क्रमांकास ३,५५५ रुपये तर तृतीय क्रमांकास २,५५५ रुपये रोख पारितोषिकासह स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले.

महिला गटात सौ. राजेमोड शीतल हनुमान, पुरुष गटात प्रकाश तुळशीराम राठोड, विद्यार्थी गटात विश्वजीत शिवाजी राठोड, तर विद्यार्थिनी गटात वैष्णवी संजय सुरवसे, यांनी प्रथम क्रमांक पटकावला.मयावेळी प्रतिक्रिया व्यक्त करताना मुखेडचे भूमिपुत्र व भारत जोडो यात्रेतील मराठवाड्यातील एकमेव भारत यात्री डॉ. श्रावण रॅपनवाड, म्हणाले, "एकता, बंधुभाव आणि निरोगी समाज हा संदेश घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या वॉकेथॉनमध्ये मुखेडकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. नागरिकांचा हा प्रतिसाद पाहून भारत जोडो यात्रेची आठवण पुन्हा एकदा जागी झाली."

या कार्यक्रमास आयोजक शहराध्यक्ष हनमंत नारनाळीकर, ज्येष्ठ नेते माधव पाटील, चंद्रकांत घाटे, बालाजी बंडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, माजी सैनिक ज्ञानेश्वर पाटील डुमने , कार्याध्यक्ष संभाजी पाटील उंद्रीकर, प्रा. अखिल येवतीकर, शिवशंकर पाटील कलंबरकर, सुनील आरगीळे, सचिन गुद्दे, शेख रियाज, सुरेश पा. बेळीकर, बालाजी वाडेकर, दिनेश केरुरकर, एम. आर. गोपनर, सतीश पा. केरुरकर आदींसह काँग्रेस पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पावसाअभावी खरिप संकटात : आ. अंतापूरकरांनी केली पाहणी

- प्रशासनास दिले आवश्क सुचना
- बिलोली तालुक्यातील शिवारात खरीप पिकांची प्रत्यक्ष पाहणी
- नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाला पंचनाम्याच्या सूचना

### संकट मोठे असले तरी शेतकऱ्यांनी धीर सोडू नये!

पावसाअभावी मतदारसंघातील शेतकऱ्यांची झालेली अवस्था राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देणार असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी ठोस आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा केला जाईलअशी ग्वाही आमदार जितेश अंतापूरकर यांनी दिली. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ ऐकून न घेता त्या प्रत्यक्ष शेतात जाऊन समजून घेणे आणि प्रशासनाच्या माध्यमातून त्यावर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणे, हीच या पाहणीची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे संकटाच्या काळात शेतकरी एकटा नाही, त्याच्या पाठीशी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन उभे आहे' असा दिलासादायक संदेश परिसरातील शेतकऱ्यांना मिळाला.

बिलोली : (स. गांवकरी)

पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांवर संकटाचे सावट निर्माण झाले असले, तरी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शासनाच्या मदतीसाठी आपण पूर्ण ताकदीने पाठपुरावा करू, अशी ग्वाही आमदार जितेश अंतापूरकर यांनी दिली. देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील किनाळा शिवारासह परिसरातील शेतांमध्ये प्रत्यक्ष जाऊन त्यांनी खरीप पिकांची पाहणी केली आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीला पावसाने साथ दिल्यानंतर आता पावसाने मोठी ओढ दिल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. विशेषतः किनाळा शिवारातील अनेक शेतांमध्ये पावसाअभावी सोयाबीन पिकाची वाढ खुंटली असून, पिकाच्या उत्पादनावर त्याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. बियाणे, खत, मशागत आणि पेरणीसाठी केलेला मोठा खर्च पावसाअभावी वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली. पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाची नितांत गरज असताना पावसाने दडी मारल्याने अनेक शेतांमध्ये पिकांची अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम आर्थिकदृष्ट्या अडचणीचा ठरण्याची चिंता शेतकऱ्यांमध्ये आहे. मात्र, या संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे असल्याचा विश्वास आमदार अंतापूरकर यांनी दिला. पाहणीदरम्यान आमदार अंतापूरकर यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. पिकांची सद्यस्थिती, झालेला खर्च, पावसाची परिस्थिती आणि संभाव्य नुकसानीची माहिती त्यांनी शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष जाणून घेतली.केवळ कागदोपत्री नव्हे, तर शेतातील वस्तुस्थितीच्या आधारे नुकसान नोंदविले जावे, यासाठी वस्तुनिष्ठ पीक पाहणी आणि पंचनामे करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकही पात्र शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहू नये यासाठी संबंधित प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, अशा सूचना महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या,यावेळी भाजप मंडळ अध्यक्ष मारोती राहीरे किनाळा सरपंच विठ्ठल माने हिप्परगा सरपंच तिरुपती डाकोरे भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष ब्रह्मा कांबळे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डिजिटल युगातील वर्तनात्मक वित्त विषयावरील FDPचे उद्घाटन

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे-बांगरवाडी येथील व्यवस्थापनविभागाच्या (MBA) वतीने AICTE Training and Learning (ATAL) Academyच्या प्रायोजकत्वाखाली 'Experimental & Applied Behavioural Finance in Digital Era' या विषयावर आयोजित सहा दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) चे उद्घाटन उत्साहात झाले. या कार्यक्रमासाठी कडलग गुंतवणूक सल्लागार, सुनील कडलग आणि चार्टर्ड अकाउंटंट गणेश बडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत,समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. कुलदीप रामटेके, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. संतोष घुले, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर,MBA विभागप्रमुख डॉ.महेश भास्कर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख व मान्यवर उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना विश्वस्त वल्लभ शेळके यांनी आधुनिक युगात आर्थिक साक्षरता वाढविणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या विस्तारामुळे आर्थिक व्यवहार, गुंतवणुकीचे निर्णय तसेच ग्राहकांच्या आर्थिक वर्तनामध्ये मोठे बदल होत आहेत. या बदलत्या परिस्थिती त वर्तनात्मक वित्त आधुनिक विषयाचा सखोल अभ्यास करून प्राध्यापकांनी आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.डिजिटल युगातील आर्थिक निर्णय प्रक्रियेतील विविध पैलू समजून घेण्यासाठी हा FDP उपयुक्त ठरेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# तिर्थक्षेत्र काळेश्वर मंदिर विष्णुपूरी येथे भाविक भक्तांनी घेतले दर्शन, महाप्रसादाचा लाभ

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

पंचक्रोशीतील नांदेड तालुक्यातील शहरापासून जवळच असलेल्या लाखो भाविक भक्तांचे व श्रध्दास्थान असलेल्या तिर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात श्रावण मासातील शेवटच्या चौथ्या श्रावण सोमवार निमित्त 7 सप्टेंबर हजारो भाविक भक्तांनी दर्शन घेतले, यावेळी गंगास्नान करून,महादेवाचा गजर करत दर्शन रांगेत जय काळेश्वर भगवान कि जय,बम बम बोले,हरहर महादेव कि जय घोषणा देण्यात आल्या,रात्री 1वाजतामहाअभिषेक तर संध्याकाळी गोदावरी माता व काळेश्वर आरती आयोजित केली होती ,यानंतर सकाळपासून मोठ्या प्रमाणात हजारो भाविक भक्तांनी दर्शन घेतले. काळेश्वर मंदिर विश्वस्त समिती यांच्या वतीने





दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रावण मास निमित्ताने शेवटच्या चौथ्या सोमवार 7 सप्टेंबर रोजी भाविक भक्तांची दर्शन साठी मोठ्या प्रमाणात गर्दी पाहता दर्शन साठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती तर ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी मोठ्या प्रमाणात अधिकारी, पोलीस अमलंदार, महिला पोलीस, होमगार्ड यांच्या कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विश्वस्त समिती पदाधिकारी यांच्या हस्ते व पुजारी रामेश्वर लिंगप्पा धणमणे स्वामी, सतिश धनमणे स्वामी,राम धनमणे,यांच्या विधीवत व मंत्रोच्चाराने महाअभिषेक डॉ.संतुकराव हंबर्डे नांदेड भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी,महा पुजा, महाआरती करण्यात आली तर सायंकाळी गोदावरी माता नदीच्या काठावर महाआरती व काळेश्वर मंदिरात संध्याकाळी आरती आयोजित करण्यात आली होती व श्रावणमास निमित्ताने दैनंदिन दुपार पासून भाविक भक्तांसाठी महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते,श्रावणमासा महिनाभर होणारी भाविक भक्तांची गर्दी पाहता वाहनतळ यासह भाविक भक्तांसाठी पिण्याचे पाणी,दर्शन रांग यासह सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती तर उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षकओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशानुसार दोन पोलीस निरीक्षक अधिकारी सपोनी उपनिरीक्षक 11, पोलीस अंमलदार महिला पोलीस कर्मचारी 90 होमगार्ड महिला होमगार्ड 65 यांच्यी नेमणूक करण्यात आली होती.गोदावरी नदी काठ किनाऱ्यावर जिवरक्षक दल तैनात करण्यात आले होते. विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय सरपंच संध्या विलास हंबर्डे, ऊपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे व ऊपसरपंच विश्वनाथ हंबर्डे ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी यांनी दर्शन घेऊन विश्वस्त समितीला सहकार्य केले.श्रावणमास निमित्ताने बेल पाने व फुले,यासह पुजेसाठी लागणारी दुकाने व खेळणी साहित्य मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी दुकाने लावण्यात आली होती,श्रावणात पंचक्रोशीतील नांदेड दक्षिण,उत्तर,यासह लोहा,कंधार, गंगाखेड,मुखेड,सह जिल्ह्यातील व अनेक तालुक्यातील भाविक भक्त दर्शन साठी मोठया प्रमाणात आले होते , शेवटच्या श्रावण सोमवार निमित्ताने विश्वस्त समिती यांच्या मार्फत भाविक भक्तांसाठी विशेष सोय उपलब्ध करून देण्यात आली होती, यावेळी राजेंजी महाराज,उध्दव हंबर्डे, जयसिंग हंबर्डे, संतोष हंबर्डे, रामचंद्र शेबोले,मारोती विष्णुपुरीकर ,शिवाजी चांदणे, त्र्यंबक आव्हाड यांच्या सह अनेक भाविक भक्तांनी दर्शन घेतले. गावातील गावकरी विश्वस्त समितीचे ऊतमराव हंबर्डे,शंकरराव हंबर्डे, धारोजीराव हंबर्डे, बालाजीराव हंबर्डे,विठ्ठलराव हंबर्डे,यांच्या सह पदाधिकारी पोलीस पाटील प्रविण हंबर्डे, सेवादार सतीश भेंडेकर गावातील युवक यांनी उपस्थित राहून दर्शन रांगा सह मंदिर परिसरात सहकार्य केले.

श्रावणमास निमित्ताने दुसऱ्या श्रावण सोमवार निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी उपस्थित भाविक भक्तांनी भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ संतुकराव हंबर्डे व उद्योजक पवन चाडावार यांच्या वतीने आयोजित महाप्रसादाचा लाभ दर्शनासाठी आलेल्या अनेक भाविक भक्तांनी घेतला.

## थोडक्यात पण महत्वाचे



## धनगर समाजाला एसटीतुन त्वरित आरक्षण द्यावे तहसीलदार यांना निवेदन

अर्धापूर (स. गांवकरी) : धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करावी यासह विविध मागण्यांसाठी दि ७ सोमवारी रोजी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाची कायदेशीर लढाई राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात पूर्ण ताकदीने लढावी व प्लॅन-बी तयार ठेवावा. मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाला लोकमाता पु. अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे. श्रीसंत बाळूमामा देवस्थान ट्रस्टसाठी स्वतंत्र शासकीय कायदा करण्यात यावा. या ट्रस्टमध्ये अस्सल मेंढपाळ समाजाचा प्रभावीना सहभागी करावे.लोणावळा येथील कनेक्टिंग लिंकला हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्यात यावे. यासह विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.शासनाने धनगर समाजाचा मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा धनगर समाजाने दिला आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे,धनगर समाज भुषण ज्ञानदीप साखरे, गोविंद साखरे,सचिन बारसे,अशोक कानोडे, अजिक्य काकडे,हरी कानोडे,भैय्या अबुके, राज अबूके,रोहिदास मुधळे,शिवशंकर परडकर, अनुज साखरे, अमृत खोंडे, सुदर्शन बेळगे,मुंजाजी दळवे, राजकिरण साखरे, केरबा साखरे,नवनाथ बारसे, नागोराव बारसे, आदिराज कानोडे, अमोल कानोडे,पुरुषोत्तम बारसे आदींसह अनेकजण उपस्थिती होते.

## जिल्हा परिषदेत राजे उमाजी नाईक जयंतीनिमित्त अभिवाद

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्हा परिषदेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार आणि जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, अशोक मोकले, प्रल्हाद थोरवटे, गजेंद्र श्रीरामवार, सूरज नाईक, शिवसाभ चेडू, प्रकाश तुतुरवाड, रामदास शेकापुरे, रविशंकर बोडके, बालाजी आवर्दे, मिलिंद व्यवहारे, शिवराज कोल्हे, सौरभ सावरकर, प्रथमेश पांचाळ, रवी येन्नावार, स्नेहल वळसे, पूजा सोनटक्के, राजरत्न ढोले, दुलबाजी हुरदुके यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

■ नागरिकांना रक्तदानाचे आवाहन!

नवी मुंबई (स. गांवकरी) : समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणारे श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता शेठ एन. के. ठाणावाला सभागृह येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांकडून विनामूल्य रक्तदान करून घेण्यात येणार असून, संकलित रक्त रक्तपेढीत जमा करण्यात येणार आहे. या रक्ताचा उपयोग गरजू रुग्ण तसेच विविध रुग्णालयांना आवश्यकतेनुसार करण्यात येणार आहे. त्यामुळे रक्तदानाच्या या उपक्रमातून अनेक रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी सातत्याने रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात येत असून, या सामाजिक कार्याची दखल घेत संस्थेला यापूर्वी पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे. यावेळी नानजीभाई खीमजीभाई ठक्कर यांनी नागरिकांना रक्तदान करण्याचे आवाहन केले. “रक्तदान हे श्रेष्ठदान आहे. आपल्या रक्तदानामुळे एखाद्या गरजू रुग्णाचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी पुढे येऊन रक्तदान करावे आणि या समाजोपयोगी उपक्रमात सहभागी व्हावे,” असे आवाहन त्यांनी केले. वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



## श्रीकृष्ण जन्माष्टमीचा भव्य सोहळा; नाटिकांनी रंगली भक्तिमय संध्याकाळ!

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे येथील शेठ एन.के.टी. सभागृहात श्री वागड रघुवंशी मित्र मंडळ, ठाणे तसेच श्री कच्छ वागड लोहाणा महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीकृष्ण जन्माष्टमीचा भव्य सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कच्छ वागड लोहाणा महिला मंडळाच्या वतीने श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित विविध सुंदर नाटिकांचे सादरीकरण करण्यात आले. या नाटिकांना उपस्थित मान्यवर, महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती आणि बालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचा शुभारंभ अध्यक्ष श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला), मानद मंत्री श्री. नटवरलाल विरजीभाई ठक्कर, सहमानद मंत्री श्री. परेश नानजीभाई ठक्कर, श्री. रमेश पुजारा, उपाध्यक्ष श्री. दिनेशभाई कोटक, कार्यकारिणी सदस्य श्री. हरेशभाई मिराणी तसेच श्री. मोहनलाल चुनीलाल पुजारा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. श्री वागड रघुवंशी मित्र मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा सातत्याने आयोजित केला जात आहे. यंदाच्या आयोजनात श्री. मुकेश मनसुखलाल, श्री. प्रवीण शांतिलाल, श्री. शंकर विरजीभाई, श्री. अजय वसंतलाल यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या सोहळ्यास मुंबई, ठाणे, डोंबिवली आणि नवी मुंबई परिसरातील वागड समाजातील असंख्य महिला मंडळांच्या सदस्यांसह ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती आणि बालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांसाठी फलाहाराची व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान, श्री वागड रघुवंशी मित्र मंडळाच्या वतीने नववर्षाच्या प्रारंभी ‘नूतन वर्षाभिनंदन’ कार्यक्रम आयोजित करण्याची परंपराही अनेक वर्षांपासून सुरू आहे. समाजातील एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# शिक्षणसंस्था म्हणजे अनेक पिढ्यांच्या भविष्याची पाया भरणी : डॉ.व्ही.एम. शिंदे

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब वाघिरे महाविद्या लय,ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त माजी प्राचार्य डॉ.व्ही. एम.शिंदे यांचे "पुणे जिल्हा शिक्षण मंडळः वसा आणि वारसा" या विषयावरी ल व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट व महाविद्यालय विकास समिती चे सदस्य डॉ.वसंत गावडे यांनी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात कै.बाबुरावजी घोलप, दिवंगत रामकृष्ण मोरे,स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पणकरून करण्यात आली.प्रास्ताविकात एन.एस. एस.कार्यक्रमाधिकारी डॉ.राजेंद्र आंबवणे यांनी मंडळाच्या स्थापने मागील उद्देश,ग्रामीण व वंचित भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी संस्थेने केलेले प्रयत्न तसेच संस्थेच्या विकासाची प्रेरणा दायी वाटचाल सांगितली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व व्याख्याते प्राचार्य डॉ.व्ही. एम. शिंदे यांनी व्याख्यानातून उपस्थितांना उद्बोधन केले. ते म्हणाले,"ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा अत्यंत मर्यादित होत्या.अज्ञान, दारिद्र्य आणि निरक्षरता यामुळे ग्रामीण समाजाच्या विकासाला मोठा अडथळा निर्माण झाला होता.“बुडते हे जन,न देखवे डोळा, येतो कळवळा” या भावनेतून शिक्षणाची गरज ओळखून समाजातील काही शिक्षणप्रेमी व्यक्तींनी ग्रामीण भागात शैक्षणिक संस्था उभारण्याचे कार्य हाती घेतले.यामध्ये कै. बाबुरावजी घोलप यांचे योगदान हे महत्वपूर्ण होते. शिक्षणाचा प्रसारकरण्यासाठी त्या काळात अनेक अडचणीं चा सामना करावा लागला. शाळांची,विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षकांची उपलब्धता यासंदर्भात शासनाने विविध नियम व अटी निश्चित केल्या होत्या.

शिक्षणाच्या प्रसारासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात आला आणि त्यातून ग्रामीण भागातील शैक्षणिक विकासाला चालना मिळाली. शिक्षणसंस्था उभारण्यासाठी आर्थिक अडचणी,जागेची समस्या व इमारत बांधकाम यांसारख्या अनेक आव्हानांना संस्थेला सामोरे जावे लागले. समाजातील दानशूर व्यक्ती, शिक्षणप्रेमी मंडळी आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे या अडचणींवर मात करण्यात आली. याच शैक्षणिक चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे संस्थेचे पहिले अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर येथे सुरू झाले.ग्रामीण भागा तील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या उभारणी साठी अनेक मान्यवरांनी प्रयत्न केले.ग्रामीण विद्यार्थ्यां ना त्यांच्या गावाजवळच उच्च शिक्षणाची संधी मिळावी, हा या प्रयत्नामागील प्रमुख उद्देश होता. महाविद्यालयाच्या विकासामध्ये ओतूर गावातील सर्वसामान्य लोकांचे योगदान खूप मोठे आहे.एखादी शिक्षणसंस्था उभी करणे ही केवळ इमारत उभारण्याची प्रक्रिया नसून, अनेक पिढ्यांचे भविष्य घडविण्याचे कार्य आहे.घोलप आयुष्यभर 'बहुजन हिताय,बहुजन सुखाय' या ब्रीद वाक्यानुसार आचरण केले."कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये, "पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या कार्याचा गौरव केला. संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंत शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडविणाऱ्या संस्थेच्या सन्माननीय आजी व माजी पदाधिकाऱ्यांच्या योगदानाचे महत्व अधोरेखित केले. वर्धापन दिन हा केवळ संस्थेच्या स्थापनेचा दिवस नसून, शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे". याविषयी माहिती दिली. सदर कार्यक्रमासाठीमहाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.अमृत बनसोडे,डॉ. एकनाथ कबाडी, डॉ.संदीपान गव्हाळे,डॉ.मनोज देशमुख,डॉ. रमेश काशीदे ,डॉ. योगेश्वर काळदंते,डॉ. संजय कुमार रहांगडाले,डॉ. ए.टी. पाडवी,डॉ. नंदकिशोर उगले, डॉ.राजेश रसाळ, डॉ. राहुल पाटील,डॉ.आशुतोष ठाकरे, डॉ. साधू कोळेकर,डॉ.धनंजय गडगे,प्रा. रोहिदास मेमाणे डॉ.पवन हांडे, प्रा. सुवर्णा डुंबरे, प्रा. रत्नमाला मोरे, प्रा. श्वेताली कुलकर्णी, प्रा.आंद्रे मॅडम, प्रा. विद्या कोठावळे, मा. उत्तम कारभळ, मा. राजेंद्र कुमार शेळके, मा. कन्हैया अभंग, आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र आंबवणे व आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ. के.डी. सोनावणे यांनी केले.

## जिल्हा परिषद ठाणेमार्फत विविध कल्याणकारी योजना

ठाणे : (स. गांवकरी)

महिला व मुलींचे शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद, ठाणेच्या महिला व बाल विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये ७ वी ते १२ वी उत्तीर्ण मुलींना संगणक प्रशिक्षण, महिलांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक साहित्य खरेदी केल्यानंतर प्रतिपूर्ती, राज्यस्तरीय विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुला-मुलींचा सत्कार तसेच शाळेत जाणाऱ्या मुलींसाठी दोन चाकी सायकल खरेदी केल्यानंतर प्रतिपूर्ती अशा योजनांचा समावेश आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी दि. १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत https://zpthaneschemes.com/ या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन महिला व बाल विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. मुलींच्या शैक्षणिक तसेच तांत्रिक कौशल्यविकासाला चालना देण्यासाठी ७ वी ते १२ वी उत्तीर्ण मुलींना संगणक प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील असणे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचा वार्षिक उत्पन्न रु. १ लाख २० हजारांच्या आत असल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. योजनेच्या लाभासाठी विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज, लाभार्थ्यांचा फोटो, दारिद्र्यरेषेखालील किंवा उत्पन्नाचा दाखला, संबंधित कालावधीतील MS-CIT संगणक प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, बँक खाते पुस्तिकेची प्रत, आधारकार्ड, जात प्रमाणपत्र असल्यास त्याची प्रत, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र किंवा शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, प्रत्यक्ष भरलेल्या प्रशिक्षण शुल्काची पावती तसेच रेशनकार्डाची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

## आधार कार्ड कॅम्प घेण्यासाठी तहसीलदार यांना निवेदन

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण व सामाजिक कार्यकर्ते रविंद्र काजळे यांच्या मार्गदर्शनाखाली जुन्नर तालुका तहसीलदार रंजित भोसले यांची समक्षभेट घेऊन जुन्नर तालुक्यातील दिव्यांग, अतितिव्र दिव्यांग,जागेवर झोपून आहेत असे दिव्यांग व जेष्ठ नागरिक यांचे आधार कार्ड वर अपडेट करणेकरिता हाताचे ठसे उमटत नाही तसेच काही दिव्यांग लोकांचे हाताचे ठसे व डोळे सारखे फिरत असतात तसेच जे दिव्यांग जागेवर झोपून आहेत त्यांना हाताचे बोट वाकडी आहेत काहिंचे बोटाचे रेषा नसल्याने त्याचे आधार कार्ड अपडेट होत नाही व काहिंचे आधार कार्ड च अतांपर्यत निघाले नाही यामुळे जागेवर झोपून असलेले दिव्यांगांना ऑनलाईन प्रमाण पत्र अपंगत्वाचा दाखला मिळाले नाही तसेच आधार कार्ड अपडेट करिता दुसऱ्या तालुक्यात दोन तीन वेळा जावूनही आधार कार्ड निघत नाही वय १८ च्या पुढील लोकांना आधारकार्ड निघत नाही तसेच जेष्ठ नागरिकांना संजय गांधी राष्ट्रीय पेन्शन व इंदिरा गांधी पेन्शन बंद असून अत्यंत हालाखीची दिवस सुरु आहे त्यांना औषधोपचार करिता व उदरनिर्वाह करण्या करिता भिक मागायचे दिवस आलेले आहेत त्यांचे आधार कार्ड बँकेच्या खात्याला KYC होत नाही म्हणून त्यांचे बँक खात्यात जमा झालेली पैसे मिळत नाही अनेक वेळा बँकेच्या अधिकारी भेट घेऊन विनंती केली तरीही बँक त्यांचे जमा पैसे देत नाही म्हणून संस्थेच्या वतीने तहसीलदार यांची समक्ष भेट घेऊन निवेदन देण्यात आले

यावेळी रंजित भोसले साहेब तहसीलदार यांनी गणेशोत्सव नंतर आधार कार्ड कॅम्प घेण्यासाठी जिल्हयाच्या ठिकाणाहून आधार कार्ड सेंटर चे मशीन तालुका स्तरावर उपलब्ध करून लवकरच गरजूंना आधार कार्ड काढून देण्यात येईल असे आश्वासन दिले आहे तो पर्यत जुन्नर शहरातील व तालुक्यातील दिव्यांग व जेष्ठ नागरिक ज्याचें आधार कार्ड अपडेट होत नाही ज्याचें आधार कार्ड निघाललेले नाही त्यानी नाव नोंदणी संस्थेच्या कडे करून घ्यावी असे श्री अरुण शेरकर अध्यक्ष यांनी केली आहे.

यावेळी दिपक चव्हाण रवींद्र काजळे,अरुण शेरकर, ताहेरा आत्तार,सुनील जंगम, गोरक्षनाथ नरवीर,मुस्तकिम पिरजादा,मजहर सौदागर, फाएक कागदी,नाझिम सौदागर व दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## श्री राधा माधव गौडीय मठात श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाची भव्य सांगता; तीन हजार भाविकांची उपस्थिती!



नवी मुंबई : (स. गांवकरी)

श्री राधा माधव गौडीय मठ ट्रस्टतर्फे सेक्टर-१७, उलवे, नवी मुंबई येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाने पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्यास सुमारे तीन हजार हरिभक्त व भाविकांनी उपस्थिती लावली. प्रमुख अतिथी म्हणून श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला), पद्मश्री अनूप जलोटा आणि श्री प्राणकृष्णदासजी उपस्थित होते. महोत्सवादरम्यान आयोजित विशेष भजनसंध्येत पद्मश्री अनूप जलोटा, श्री प्राणकृष्णदासजी यांच्यासह विविध भजन कलाकारांनी भक्तिगीतांचे सादरीकरण केले. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यावेळी श्री राधा माधव गौडीय मठाच्या भव्य मंदिर निर्माणकार्याबाबत महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. सुमारे तीन हजार वारांच्या भूखंडावर तब्बल २०० कोटी रुपये खर्चून भव्य मंदिर उभारण्यात येणार असून, मंदिराचे आवार व प्रवेशद्वार उभारण्यासाठी एन.के.टी. ट्रस्टच्या माध्यमातून धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर यांच्याकडून सहकार्य करण्यात येणार आहे. यावेळी श्री नानजीभाई ठक्कर यांनी मंदिराच्या निर्माणकार्यात प्रत्येक व्यक्तीचा सहभाग व सहकार्य महत्त्वाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमात नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते पद्मश्री अनूप जलोटा यांचा शाल, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच मंदिराचे प्राणदासजी महाराज यांनी नानजीभाई ठक्कर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. उपस्थित राहून सहकार्य केल्याबद्दल नानजीभाई ठक्कर यांचे आभार मानण्यात आले. भक्तिमय वातावरणात श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाची उत्साहात आणि यशस्वीपणे सांगता झाली.

## खिडकाळी मंदिर परिसरात कृत्रिम विसर्जन तलाव उभारणीला सुरुवात

ठाणे, दिवा : (स. गांवकरी)



खिडकाळी मंदिर परिसरात यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून कृत्रिम गणेश विसर्जन तलाव उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. सन २०१८ पासून या ठिकाणी कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात येत असून, दरवर्षी हजाराहून अधिक गणेशमूर्तींचे सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने विसर्जन केले जाते. पूर्वी खिडकाळी तलावामध्ये मोठ्या प्रमाणावर गणेशमूर्तींचे विसर्जन केले जात असल्याने तलावातील मासे मृत्युमुखी पडण्याच्या घटना घडत होत्या. तलावातील जैवविविधता अबाधित राहावी तसेच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने ठाणे महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करून कृत्रिम विसर्जन तलावाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. येत्या चार-पाच दिवसांत कृत्रिम तलावाचे काम पूर्ण होणार असून, गणेशभक्तांना विसर्जनाच्या वेळी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी महापालिकेच्या वतीने आरोग्य सेवा, अग्निशमन दल, सुरक्षा रक्षक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांची आवश्यक व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे गणेशभक्तांनी पर्यावरणपूरक पद्धतीने कृत्रिम तलावात गणेशमूर्तींचे विसर्जन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कृत्रिम तलावाच्या कामाच्या सुरुवातीच्या वेळी नगरसेवक बाबाजी पाटील, दिपेश पाटील, नगरसेविका सौ. अर्चना निलेश पाटील, तसेच खिडकाळी परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माळशेज नागरी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव





ठाणे : (स. गांवकरी)

### शिक्षणमहर्षी नानजीभाई ठक्कर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन!

शेठ एन.के.टी. सभागृह, ठाणे येथे माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. यावेळी विद्यार्थी गुणगौरव सोहळाही मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमास शिक्षणमहर्षी श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला), ‘दैनिक समर्थ गांवकरी’चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, संस्थेचे चेअरमन ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे, श्रीमती नयना डुंबरे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळाचे सदस्य, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना शिक्षणमहर्षी श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाला जीवनातील सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले. मेहनत, सातत्य आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या प्रगतीसोबतच समाज आणि देशाच्या विकासासाठी योगदान देण्याचा संकल्प करावा, असे त्यांनी सांगितले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ कौतुकाचा विषय नसून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा उपक्रम असल्याचेही त्यांनी नमूद केले. ‘दैनिक समर्थ गांवकरी’चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत संस्कार, सामाजिक जाणीव, ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास आत्मसात करण्याचे आवाहन केले. शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, संस्थेचे चेअरमन श्री. चंद्रकांत डुंबरे यांनी शिक्षणमहर्षी श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर तसेच ‘दैनिक समर्थ गांवकरी’चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. नानजीभाई ठक्कर हे संस्थेच्या प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहून सातत्याने प्रोत्साहन देतात. त्यांच्या उपस्थितीमुळे संस्थेला नवी ऊर्जा व प्रेरणा मिळते. सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांना त्यांचा नेहमीच मनापासून पाठिंबा असून, त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य आमच्यासाठी अत्यंत मोलाचे आहे, असे चंद्रकांत डुंबरे यांनी यावेळी सांगितले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत कार्यक्रमाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली.

# धोकादायक नदी-धबधब्यांवर पर्यटक बिनधास्त; प्रशासनाचे आदेश फक्त कागदावर?

## धोकादायक ठिकाणी प्रवेशबंदीचे आदेश असतानाही अंमलबजावणीचा अभाव; सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह



**डांग, गुजरात : (स. गांवकरी)**

पावसाळ्यात डांग जिल्ह्यातील नद्या, धबधबे, चेकडॅम आणि जलाशय धोकादायक बनत असतानाही पर्यटकांच्या सुरक्षेबाबत प्रशासनाची कार्यपद्धती संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. एकीकडे प्रशासनाकडून धोकादायक ठिकाणी पर्यटकांना प्रवेशबंदीचे आदेश जारी केले जातात, तर दुसरीकडे या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था आणि सतत देखरेख नसल्याचे चित्र दिसत आहे.त्यामुळे प्रशासनाचे आदेश फक्त कागदावर आणि घटनास्थळी लावलेल्या फलक व बांबूच्या अडथळ्यांपुरतेच मर्यादित आहेत का?, असा सवाल उपस्थित होत आहे. डांग जिल्हा प्रशासनाने नदी, तलाव, धबधबे आणि चेकडॅम यांसारख्या धोकादायक ठिकाणी पर्यटकांनी प्रवेश करू नये, याबाबत नुकतेच आदेश जारी केले आहेत. मात्र, तरीही वघई-सापुतारा मार्गावरील रंभास फार्म, साकरपातळ कुंडा फाटक तसेच चिखलदा पुलाजवळ अंबिका नदीच्या प्रवाहात पर्यटक जीव धोक्यात घालून उतरत असल्याचे दृश्य समोर येत आहे.

पावसाळ्यात अंबिका नदीचा प्रवाह अचानक वाढण्याची शक्यता असते. नदीपात्रातील शेवाळामुळे दगड आणि पृष्ठभाग अत्यंत निसरडा होतो. त्यामुळे पाय घसरून गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत नदीत उतरणे पर्यटकांच्या जीवावर बेतू शकते. तरीदेखील काही पर्यटक कुटुंबासह या ठिकाणी येऊन धोकादायक पाण्यात उतरून स्नान करताना दिसत आहेत. त्यामुळे प्रशासनाने जारी केलेल्या प्रवेशबंदीच्या आदेशांची अंमलबजावणी नेमकी कुठे आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सर्वात महत्त्वाचा सवाल असा आहे की, प्रशासनाला धोकादायक ठिकाणांची माहिती आहे आणि प्रवेशबंदीचे आदेशही जारी केले आहेत, तर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेले अधिकारी, पोलीस, होमगार्ड किंवा सुरक्षा कर्मचारी घटनास्थळी सतत का दिसत नाहीत?केवळ आदेश जारी करणे आणि चेतावणीचे फलक लावणे एवढ्याने पर्यटकांची सुरक्षा सुनिश्चित होऊ शकत नाही. प्रतिबंधित ठिकाणी पर्यटक खुलेआम प्रवेश करत असतील आणि जीवघेण्या नदीच्या प्रवाहात उतरत असतील, तर प्रशासनाच्या देखरेख व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या डांग जिल्ह्यात पावसाळ्यात मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होतात. विशेषतः सापुताराकडे जाणाऱ्या मार्गावरील नदी, धबधबे आणि नैसर्गिक पर्यटनस्थळांवर पर्यटकांची मोठी गर्दी असते. अशा परिस्थितीत धोकादायक ठिकाणी बॅरिकेडिंग, स्पष्ट चेतावणी फलक, सुरक्षा कर्मचाऱ्यांची नियुक्ती, पोलीस-होमगार्डची उपस्थिती आणि सातत्याने पेट्रोलिंग करणे आवश्यक आहे.

## थोडक्यात बातम्या...



### ठाणे महानगरपालिकेचा ४४वा वर्धापन दिन १ ऑक्टोबर रोजी

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन १ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्धापन दिनाचा मुख्य कार्यक्रम राम गणेश गडकरी रंगायतन येथे आयोजित करण्यात आला असून, या निमित्ताने ठाणे शहराच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नागरिकांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी दिली. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन, विविध उपक्रम, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, शिवसेना गटनेते पवन कदम, उथळसर प्रभाग समिती सभापती नारायण पवार, वागळे प्रभाग समिती अध्यक्षा एकता भोईर, कळवा प्रभाग समिती सभापती विजया लासे, दिवा प्रभाग समिती सभापती दीपक जाधव, नगरसेवक रमाकांत मढवी, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर आदी उपस्थित होते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ठाणेकरांनी पुरस्कारासाठी अर्ज करताना संबंधित नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसहित स्थानिक नगरसेवकांच्या शिफारशीसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे. नागरिकांनी आपले अर्ज दोन प्रतींमध्ये महापौर कार्यालय, पहिला मजला, ठाणे महानगरपालिका, पाचपाखाडी, ठाणे येथे सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १८ सप्टेंबर २०२६ आहे. या मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पुरस्कारासाठी अंतिम निर्णय हा गठीत करण्यात येणाऱ्या समितीचा राहिल असेही महापौरांनी नमूद केले आहे.



### परिस्थिती वर मात करून सख्या बहिणीने MPSC मध्ये मिळविले मोठे यश

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापुरातील गवळी वस्तीत राहणाऱ्या संजीवनी भोजने आणि सरोजिनी भोजने या सख्ख्या बहिणींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत MPSC परीक्षेत एकत्र यश मिळवले आहे. दोघींची टॅक्स असिस्टंट पदावर निवड झाली असून त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही त्यांनी शिक्षणाची साथ सोडली नाही. अभ्यासासाठी आवश्यक साधनांची कमतरता आणि अनेक अडचणी समोर असतानाही जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर त्यांनी आपले ध्येय गाठले. दोन्ही बहिणींनी एकत्रितपणे मिळवलेले हे यश त्यांच्या कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. त्यांची कहाणी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, परिस्थिती कितीही कठीण असली तरी मोठी स्वप्ने आणि प्रामाणिक मेहनत असेल तर यश मिळवता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे. संजीवनी आणि सरोजिनी यांचे मनःपूर्वक अभिनंदन होत आहे.

### बैलपोळा साजरा करूया, पण बैलांवर अन्याय नको

सोलापूर (स. गांवकरी) : येत्या गुरुवारी दिनांक 10 सप्टेंबर 20 26 रोजी बैल पोळा हा शेतकऱ्यांचा सण असून हा सण शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणावर उत्साहात साजरा करत असतात. बैल हे शेतकऱ्यांचे दैवत असल्यामुळे या दिवशी बैलाची पुजा अर्चा करून त्यांचे पूजन केले जात असते. त्यांना सजविले जाते परंतु हे करत असताना शेतकऱ्यांकडून न कळत बैलांवर अन्याय केला जातो हा अन्याय होऊ नये यासाठी ॲनिमल राहत संस्था बैलांच्या हक्कासाठी लढत आहे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करत आहे. बैलपोळा साजरा करूया, पण बैलांवर अन्याय नको, शिंगे तासु नका रासायनिक रंग लावू नका. असे आवाहन ॲनिमल राहत संस्थेने केले आहे. ॲनिमल राहत संस्थेचं बैल मालकांना भावनिक आवाहन करण्यात आले आहे. गुरुवार दिनांक 10 सप्टेंबर रोजी बैल पोळा सण आहे. हा सण प्रामुख्याने श्रावण अमावस्याच्या पिठोरी अमावस्या साजरा केला जातो बैलपोळा हा सण महाराष्ट्रात बैलांसाठी महत्वाचा मानला जातो,गावोगावी बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा होतो, पूर्वी बैलपोळा सण नैसर्गिक पद्धतीने साजरा केला जायचा पण काळाच्या ओघात बैलपोळा साजरा करण्याची पद्धत बदलत गेली,बैल सुंदर दिसण्यासाठी त्यांची शिंगे तासने, शिंगाणा आणि शरीरावर रासायनिक रंग लावणे त्यांना डॉल्बी समोर मिरवणुकीत तासनतास उभा करणे या सर्व चुकीच्या पद्धती मुळे बैलांना वेळवेगळे त्रास आणि आजार होतात.

# बिलोली तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा

## हेक्टरी २ लाख रू द्या व शंभर टक्के विमा मंजुर करा : शेतकऱ्यांचे मुख्यमंत्र्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**बिलोली : (स. गांवकरी)**

गेल्या एक महिना भरापासून पावसाने दडी मारल्यामुळे खरीप पिके पूर्णता करपु लागली आसून आता बळीराजा मोठ्या अर्थिक अडचणीत सापडला आसुन

या हवालदिल शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने बिलोली तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करून हेक्टरी २ लाख रूपये व शंभर टक्के पिक विमा मंजुर करावा या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्याकडे पाठवण्यात आले.



खरीप पेरणी हंगामातील मुख्य पिक सायाबिनचा पेरा तालुक्यात सर्वाधिक आसतो.सोयाबीन बियाणे कंपन्यानी यंदा बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाहीन सोयाबीन विक्रीचा अर्थिक फटका सोसत दुबारा तिबारा पेरणी केले. पिकाचे उत्पन्न वाढीच्या अपेक्षे पोटी रासायनिक खत, किटक नाशक फवारणी,कोळपनी -खुरपनी वाढलेल्या मजुरीचा भुर्दंड सोसत पिकांचे वेळोवेळी संगोपन केले. पण ऐन फुल चट्टा बहारात आसताना गेल्या एक महीना भरापासुन वरून राजा दडी मारल्यामुळे सर्वच खरीप पिके करपु लागले आसुन शेतकऱ्यांच्या खरीप पिक उत्पन्नाच्या आशा मावळल्या आसुन आता यापुढे पडलेल्या पावसाचा तिळमात्र उपयोग नसुन या अर्थिक संकटात सापडलेल्या बळीराजाना दिलासा देण्यासाठी शासनाने बिलोली तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करून हेक्टरी २ लाख रुपये अनुदान द्यावे, शंभर टक्के पिक विमा मंजुर करावा, रब्बी हंगाम पेरणीसाठी हेक्टरी पंचविस हजार रू. द्यावे सन २०२३ते २०२५ चा थक्कीत विम्याचे वाटप करावे, बाभळी बंधारा बँक वाटर नुकसानी थकीत मावेजा वाटप करावा. आदी मागण्यांचे निवेदन आज दि. ११ सप्टेंबर रोजी तहसिलदार बिलोली यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे देण्यात आले.

यावेळी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस केदार पाटील साळुंके शेतकरी जनआंदोलन संघर्ष समितीचे भगवान मनुरकर भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे राजु पाटील शिंपाळकर,शंकर मावलगे, सय्यद रियाज, तानाजी पा.चिरलीकर,श्रीपत पा. साळुंके,सुर्यकांत पा. कदम, वसंत पा. बडुरकर, परबत पा. साळुंके,चक्रधर टेकाळे,शेख ईब्राहीम केसराळीकर,संभाजी साखरे, विलास पुयड,मोहन गुलाडे,शेख फेरोजपाशा, माधव साळुंके, संतोश साळुंके,विलास पुयड माधव जाधव, दिंगाबर दापके, माधव कबनुरे, शिवाजी साळुंके,एकनाथ हिवराळे,दत्ताहरी ईबितवार यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या सह्यांचे निवेदन देण्यात आले.

# शेतकरी बांधवांनो सावधान! कांदा बियाण्याच्या नावाखाली मोठा खेळ

**कनाशी : (स. गांवकरी)**



- जाहिरातींच्या भूलथापांना बळी पडलात तर हंगाम हातचा जाणार!

कांदा लागवडीचा हंगाम तोंडावर आला असून, कळवण तालुक्यातील सगळ्याच बाजारात सध्या कांदा बियाण्यांच्या वेगवेगळ्या व्हरायटींची जाहिरात करून शेतकऱ्यांना अक्षरशः वेडे केले जात आहे. गावोगावचे दुकानदार आमचेच वाण भारी डबल पत्ती एक्स्ट्रा कलर अशा गोंडस जाहिराती देऊन शेतकऱ्यांच्या माथी बियाणे मारत आहेत. पण शेतकरी बांधवांनो, घाईत बियाणे घेतले तर संपूर्ण वर्षाची मेहनत मातीत मिळेल, हे लक्षात ठेवा! जाणकार शेतकऱ्यांच्या मते, बियाणे खरेदी करताना केवळ जाहिरातीवर अवलंबून राहू नका. बियाण्याची जर्मिनेशन (उगवण क्षमता) किती आहे? पत्तीची जाडी कशी आहे? कांद्याला कलर येईल का? साठवण (टिकवण) क्षमता किती दिवसांची आहे? सड (कुज) होण्याचे प्रमाण किती? या सर्व बाबींचा विचार करूनच वाणाची निवड करा. सध्या बाजारात अनेक बनावट आणि सुट्ट्या बियाण्यांचा सुळसुळाट झाला आहे. काही महाभाग बिल न देता स्वस्तात बियाणे विकत आहेत. शेतकरी चार पैसे वाचवण्यासाठी त्यांच्या नादी लागतो आणि नंतर पीक फसले की रडत बसतो. लक्षात ठेवा, बिलाशिवाय बियाणे घेतले तर तक्रार करायला तुमच्याकडे कोणताच पुरावा राहत नाही.

# मुगाच्या शेंगा तोडताना सर्पदंश; झाल्याने शेतकरी महिलेचा मृत्यू

**नायगाव : (स. गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील दरेगाव येथे दक्षिण बाजूला धानोरा वाटेवर असलेल्या शेतात मुगाच्या शेंगा तोडत असताना विषारी सापाने दंश केल्याने ४८ वर्षीय शेतकरी महिलेचा उपचारासाठी दवाखान्यात नेत असतानाच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली.

श्रीमती जनाबाई अशोक पाटील शिंदे असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेने दरेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून दरेगाव गावावर शोककळा पसरली आहे. दरेगाव येथील शेतकरी अशोक शिंदे व त्यांच्या पत्नी जनाबाई शिंदे हे मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे शेतातील कामासाठी गेले होते. शेतात मुगाच्या शेंगा तोडण्याचे काम सुरू असताना अशोक शिंदे हे अन्य कामासाठी काही अंतरावर गेले होते. त्याचवेळी उष्णतेमुळे जमिनीबाहेर आलेल्या सापावर जनाबाई शिंदे यांचा पाय पडला. यावेळी सापाने त्यांच्या पायाला दंश केला. सर्पदंश होताच जनाबाई यांची प्रकृती अचानक गंभीर झाली.त्या घाबरल्या त्यांच्या मदतीसाठी पती व शेजारील शेतकऱ्यांनी धाव घेतली.



- दरेगावात ही दुर्दैवी घटना घडली
- ४८ वर्षीय जनाबाई शिंदे यांच्या निधनाने गावावर शोककळा पसरली

तत्काळ त्यांना उपचारासाठी मांजरम प्राथमिक आरोग्य केंद्राकडे घेऊन जाण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच वाटेत त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची माहिती दरेगावात पोहोचताच गावात एकच खळबळ उडाली. जनाबाई शिंदे यांच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीय, नातेवाईक तसेच ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पती अशोक शिंदे, एक अविवाहित मुलगा व दोन विवाहित मुली असा परिवार आहे. त्या राहुल अशोक पाटील शिंदे यांच्या मातोश्री होत.

# राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राजीनाम्याची एकमुखी मागणी

**नाशिक : (स. गांवकरी)**

मराठा क्रांती मोर्चाची राज्यस्तरीय बैठक मंगळवारी नाशिक येथे राज्यातील विविध जिल्ह्यांतील समन्वयक व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली.या बैठकीत मराठा समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून राज्य सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करत त्यांच्या राजीनाम्याची एकमुखी मागणी करण्यात आली.



मराठा समाजाला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात संविधानिक व कायदेशीर चौकटीत देण्यात आलेल्या १० टक्के SEBC आरक्षणाला मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ३०/२०२४ द्वारे आव्हान देण्यात आले असून सदर याचिका प्रलंबित आहे.या प्रकरणाच्या सुनावणीकडे राज्य सरकारकडून अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला.आरक्षणाच्या संरक्षणासाठी सरकारने प्रभावीपणे न्यायालयीन भूमिका मांडणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्यास त्याची जबाबदारी मराठा आरक्षण उपसमिती आणि राज्य सरकारने स्वीकारावी,अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्षपद स्वीकारल्यापासून मराठा क्रांती मोर्चाच्या राज्य समन्वयकांना विश्वासात घेऊन एकही ठोस बैठक घेतलेली नाही,असा आरोपही करण्यात आला.समाजाच्या विविध प्रश्नांवर सामूहिक चर्चा व समन्वयाची गरज असताना सरकारकडून मराठा क्रांती मोर्चाला जाणीवपूर्वक बाजूला ठेवले जात असल्याची भावना राज्य समन्वयकांनी व्यक्त केली. सारथी संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमधील अडचणी,विद्यार्थ्यांच्या फेलोशिप व शिष्यवृत्तीचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी करण्यात आली.सारथी संस्थेला भरीव आर्थिक बळ देण्यासाठी तातडीने १,००० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा,अशी मागणी करण्यात आली.

तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कर्जावरील व्याज परताव्याचा प्रश्न तातडीने सोडवावा.व्याज परतावा रखडल्यामुळे लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून काही लाभार्थ्यांच्या कर्ज व क्रेडिट इतिहासावर परिणाम होत असल्याची बाब बैठकीत मांडण्यात आली.हा प्रश्न तातडीने मार्गी लावून लाभार्थ्यांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय राज्यातील काही शासकीय व निमशासकीय आस्थापनांमध्ये SEBC आरक्षणाची पूर्ण अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याचा आरोप करत संबंधित विभागांना तातडीने निर्देश देऊन आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.

मराठा समाजाच्या आरक्षणासह सारथी, शिष्यवृत्ती, फेलोशिप, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, शासकीय व निमशासकीय सेवांमधील SEBC आरक्षण आणि इतर प्रलंबित मागण्यांकडे सरकारने तातडीने लक्ष देऊन ठोस निर्णय घ्यावेत.मराठा क्रांती मोर्चाला विश्वासात न घेता समाजाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केल्यास तो खपवून घेतला जाणार नाही,असा स्पष्ट इशारा बैठकीत देण्यात आला.

मराठा क्रांती मोर्चाने आजपर्यंत सामूहिक नेतृत्वाच्या माध्यमातून समाजाच्या हिताचे निर्णय घेतले आहेत.मात्र समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याऐवजी सामूहिक नेतृत्व कमकुवत करून एका व्यक्तीभोवती चळवळ केंद्रित करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला.

# ग्राहकाने खरेदी केलेल्या गुळाचा गैरवापर

- ग्राहकासह दुकानदारही झाला आरोपी
- म्हाळुंगे एम. आय. डी. सी.पोलिसांची कारवाई

प्रतिष्ठित व्यापारी बाबत झालेली घटना दुर्दैवी आहे.विविध दुकानातून अशा अनेक वस्तु आहे विक्रीनंतर त्याचा दुरुपयोग होतो.म्हणून विक्रेत्यास दोषी ठरविणे उचित नाही.पोलिस प्रशासनाकडून झालेल्या चुकीच्या कारवाई ने व्यापारी बांधव धास्तावले असून,पोलिसांच्या या चुकीच्या कारवाईचा आम्ही निषेध व्यक्त करतो,

**- माणिक होरे, अध्यक्ष, राजगुरुनगर शहर व्यापारी महासंघ**

दुकानातील अनेक जीवनाश्यक वस्तू मध्ये खाण्याचा गुळाची विक्री होते.संबधित आरोपी ग्राहकाने खरेदी केलेला गुळ कोणत्या कारणासाठी घेतला आणि त्याचा पुढे कथित गैरवापर होईल, याची आम्हाला कोणतीही कल्पना नव्हती. उत्तर म्हाळुंगे पोलिसांनी दारूसाठी गुळ दिला म्हणून पोलिसांनी ११ वाजेपर्यंत पोलिस ठाण्यात बसवून ठेवले. माझ्यावर गुन्हा दाखल करण्याऐवजी माझ्या मुलावर दाखल केला आहे. .पोलिसांनी केलेली कारवाई अन्यायकारक आहे. आम्हाला न्याय मिळाला पाहिजे.

**— सलीम मोमीन, दुकानाचे मालक**



गुळ विकला म्हणून व्यापारी बाप लेकावर वर झालेला अन्याय चुकीचा असून प्रशासनाने याची दखल घेऊन ,झालेल्या कारवाईची चौकशी करावी ,मोमीन कुटुंबाला न्याय द्यावा.

- फैज मोमीन, नगरसेवक, राजगुरुनगर नगर परिषद

**राजगुरुनगर : (स. गांवकरी)**

ग्राहकाने खरेदी केलेल्या गुळाचा दारूसाठी गैरवापर केल्याचे निष्पन्न झाल्याने गुळ विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर म्हाळुंगे एम. आय. डी. सी.पोलिसांनी गुन्ह्यात सहभाग असल्याचा ठपका ठेवत गुन्हा दाखल केल्याने राजगुरुनगर व्यापारी महासंघाने संताप व्यक्त करीत निषेध व्यक्त केला आहे. थोडक्यात माहिती अशी की राजगुरुनगर येथील प्रतिष्ठित व्यापारी सलीम मोमीन व पुत्र शोएब मोमीन यांचे मोमीन प्रोव्हीजन नावाचे किराणा भुसार मालाचे दुकान आहे.पंधरा दिवसापूर्वी संबंधित ग्राहकाने गायींना खाण्यासाठी गुळ आवश्यक असल्याचे सांगत ५०किलो गुळ दुकानातून नेला.मात्र या गुळाचा वापर संबंधित ग्राहकाने उत्तर म्हाळुंगे एम. आय. डी. सी.परिसरात गावठी दारू बनविण्यासाठी उपयोग केला असल्याचे पोलिस कारवाईत सांगण्यात आले.चौकशीत गुळाचा वापर दारूसाठी केल्याने व्यापारी सलीम मोमीन,व शोएब मोमीन यांना पोलिसांनी तुमचा जबाब घ्यायचा असल्याचे सांगत,मोमीन पिता पुत्राला उत्तर म्हाळुंगे एम आय डी एम. पोलिस ठाण्यात नेऊन शोएब मोमीन याच्यावर सदर गुन्ह्यात सहभागी असल्याचा ठपका ठेवत गुन्हा दाखल केला आहे. या अन्यायकारक कारवाईने राजगुरुनगर येथील व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून जीवनाश्यक वस्तू ची विक्री करणे कायदेशीर गुन्हा ठरणार असेल तर आम्ही त्याचा निषेध करतो.व या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन निःपक्ष पणे चौकशी करावी अशी मागणी करीत व्यापारी महासंघाने तहसीदार यांना निवेदन दिले.यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माणिक होरे, बंटी लोढा,अमर टाटीया,नगरसेवक फैज मोमीन,अशोक दुगड संजय भंडारी, सतीश ओसवाल, नितीन शहा,सुरेश शिंगवी, कुशल ओसवाल,स्वानंद खेडकर, जितेंद्र चव्हाण,बाळू ओसवाल, भूपेंद्र ओसवाल, श्रीपाल ओसवाल आदी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २६६ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार दि. ०९ सेप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## ग्रामपंचायतींच्या कारभाराला मिळणार गती

### मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीला मंजुरी

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुदत संपलेल्या, मात्र प्रशासकीय अडचणींमुळे निवडणुका अद्याप झालेल्या नसलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभाराला आता गती मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याबाबत अधिसूचना जारी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सुरळीत ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

अधिसूचनेनुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे आणि प्रशासकीय कारणांमुळे अद्याप निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, अशा ग्राम पंचायतींवर विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (आरोग्य), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा अन्य शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करता येणार आहे.

नियुक्त करण्यात येणाऱ्या प्रशासकांचा कार्यकाळ महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यंत किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहणार आहे.

सरपंच परिषदेच्या पाठपुराव्याला यश

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी सरपंच परिषदेचे महाराष्ट्र-मुंबई अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन पाठपुरावा केला होता. निवडणुका प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत राहण्यासाठी प्रशासक नियुक्त करण्याची मागणी त्यांनी मंत्री गोरे यांच्याकडे केली होती.

या पाठपुराव्यानंतर शासनाने सकारात्मक निर्णय घेत अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे मुदत



संपलेल्या आणि निवडणुका प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या निर्णयामुळे निवडणुका प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतींचा प्रशासकीय कारभार ठप्प होणार नाही. ग्रामस्थांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा, विकासकामे आणि दैनंदिन प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे सुरू ठेवण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिक सक्षम, प्रभावी आणि गतिमान करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

## भारताशी व्यापार करणाऱ्या देशांमध्ये 'यूपीआय'चा विस्तार करणार

### पंतप्रधान नरेंद्र मोदी; 'यूपीआय'शिवाय भारताची फिनटेक कहाणी अपूर्ण

मुंबई (समर्थ गांवकरी)



भारतातील डिजिटल व्यवहारांच्या पलीकडे आता 'यूपीआय'चा विस्तार भारताशी व्यापार करणाऱ्या देशांमध्ये करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न राहणार आहे. भारत-सिंगापूरदरम्यान यूपीआयच्या माध्यमातून व्यवहार करणे दोन भारतीय शहरांमधील व्यवहाराइतकेच सुलभ झाले असून, याच धर्तीवर भारताशी व्यावसायिक संबंध असलेल्या अन्य देशांमध्येही यूपीआयचे जाळे विस्तारण्याची भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी मुंबईत मांडली. 'यूपीआय' हा भारताच्या फिनटेक क्षेत्रातील परिवर्तनाचा प्रमुख आधार असून, त्याचा उल्लेख केल्याशिवाय भारताची फिनटेक कहाणीच अपूर्ण राहते, असे मोदी यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी (८ सप्टेंबर) बीकेसी येथील 'जिओ वर्ल्ड' सेंटरमध्ये 'ग्लोबल फिनटेक फेस्ट' २०२६ चे उद्घाटन झाले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. या जागतिक फिनटेक महोत्सवाची सातवी आवृत्ती ८ ते ११ सप्टेंबर या कालावधीत मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. उद्घाटन सोहळ्याला जगभरातील तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोदी यांनी भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेतील यूपीआयच्या भूमिकेचा विशेष उल्लेख केला. २५ ऑगस्ट रोजी यूपीआयने दहा वर्षे पूर्ण केली. दहा वर्षांपूर्वी 'तुमची बँक तुमच्या हातात असेल' असे सांगितले असता अनेकांना ते अशक्य वाटत होते, अशी आठवण मोदी यांनी करून दिली. यूपीआयमुळे आर्थिक सेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

## मोक्का कारवाईची चौकशी करा; दोषी पोलिसांच्या संपत्तीचीही चौकशी करण्याची मागणी

### रिपाइं (आठवले) तालुकाध्यक्ष राजेंद्र उबाळे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

पारनेर (समर्थ गांवकरी)



बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राजापूर (ता. श्रीगोंदा) येथे एका गुन्ह्यात बेकायदेशीररीत्या महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे पारनेर तालुकाध्यक्ष राजेंद्र उबाळे यांनी केला आहे. या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच त्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी, या मागणीसाठी उबाळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात उबाळे यांनी म्हटले आहे की, राजापूर येथे संबंधित घटना घडली, त्यावेळी ते पुणे येथे होते. आपण घटनास्थळी उपस्थित नसल्याचे सीसीटीव्ही फुटेज तसेच इतर पुरावे पोलिसांना दिले होते.

## कोकणवासियांसाठी गणपती विशेष ट्रेन, कुठून कधी धावणार? वाचा संपूर्ण वेळापत्रक

मुंबई (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवानिमित्त नोकरदारांची आपल्या गावी जाण्यासाठी सध्या एकच गर्दी पाहायला मिळत आहे. रेल्वे, एसटी बस, खासगी ट्रॅव्हल्स आणि खासगी वाहन अशा वेगवेगळ्या माध्यमातून नोकरदार आपल्या गावी जात आहेत. अशातच मध्य रेल्वेने खास गणशोत्सवानिमित्त काही गणपती विशेष ट्रेन्सची घोषणा केली आहे. कोकण रेल्वेकडून दोन अनारक्षित मेमू ट्रेनची घोषणा करण्यात आली असून या ट्रेन्सच्या वेळापत्रक, फेऱ्या आणि त्यांच्या थांब्याबद्दल जाणून घेऊया...

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वेकडून दोन विशेष अनारक्षित रेल्वे सेवा चालवल्या जाणार आहेत. कोकणात गावी जाताना प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून रेल्वेने विशेष गाड्या सोडल्या आहेत. मडगाव-लोकमान्य टिळक टर्मिनस आणि चिपळूण- पनवेल अशा २ गाड्यांच्या फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. जरीही प्रवाशांचं रेल्वेचं तिकिट कन्फर्म नसलं तरीही प्रवासी आरामात या एक्स्प्रेसने प्रवास करू शकणार आहेत. कोकणवासीयांचा एका अर्थी परतीचा प्रवास सुखकर होणार, हे नक्की.

मडगाव- लोकमान्य टिळक टर्मिनस ही विशेष रेल्वे १५ आणि १८ सप्टेंबर रोजी मडगाववरून दुपारी ४ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनसला पोहोचेल. पुन्हा परत येताना ती रेल्वे १६ आणि १९ सप्टेंबर रोजी एलटीटीवरून सकाळी ७ वाजता सुटेल आणि रात्री ११:४५ च्या दरम्यान मडगाव स्थानकावर पोहचेल. ह्या एक्स्प्रेसचं बुकिंग करायचे झाल्यास ते आजपासून अर्थात ८ सप्टेंबरपासून प्रवाशांना करता येणार आहे. या एक्स्प्रेससोबत रेल्वे कडून आणखी एक विशेष मेमू लोकल चालवली जाणार आहे.

## जी. एस. महानगर बँकेच्या ठेवींमध्ये ९ महिन्यात १५२ कोटी रुपयांची वाढ

### अध्यक्षा गीतांजली ताई शेळके महानगर बँकेचा एनपीए शुन्य टक्के

मुंबई (समर्थ गांवकरी)

जी एस महानगर बँकेवर सभासद व खातेदार यांचा वाढता विश्वास, कर्ज व्यवसायाचा विस्तार व आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापरामुळे अवघ्या ९ महिन्यात १५२ कोटी रुपयांच्या ठेवीत वाढ झाली असल्याची माहिती अध्यक्षा सौ गीतांजलीताई शेळके यांनी दिली आहे.तर जून २०२५ मध्ये नवीन संचालक मंडळाची धुरा स्वीकारल्यानंतर मार्च २०२६ अखेर ठेवींमध्ये १५२ कोटी ६२ लाखांची वाढ झाली असून एकूण ठेवी ३ हजार १७५ कोटी रुपये झाल्या आहेत.तर छोट्या मोठ्या उद्योग व्यवसायांना ८७ कोटी ६४ लाख रुपयांची कर्जे वाढ झाल्याची माहिती जी. एस. महानगर बँकेच्या अध्यक्षा शेळके व उपाध्यक्ष भास्कर कवाद व संचालक मंडळाने दिली आहे.

यावेळी उपाध्यक्ष भास्कर कवाद यांनी सांगितले की, मागील काही वर्षांच्या तुलनेत बँकेच्या कर्ज व्यवसायात सातत्याने वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२३ मध्ये बँकेची एकूण कर्जे १ हजार ५५४ कोटी रुपये होती. २०२४ मध्ये १८ कोटी ६४ लाख रुपयांनी वाढ झाली.

२०२५ मध्ये ५ कोटी ९० लाख रुपयांची वाढ झाली. ९ जून २०२६ रोजी नविन संचालक मंडळाने कारभार हाती घेतला व व्यवसाय वाढीच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून झाला. ३१ मार्च २०२६ अखेर कर्ज व्यवसायात ८७ कोटी ६४ लाखांची वाढ झाली. एकूण कर्ज व्यवसाय १ हजार ६६७ कोटी रुपयांवर पोहोचला ही बँकेच्या व्यवसाय वृद्धीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाब मानली जात आहे.

सभासद व ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन बँकेने फार्मा, वैद्यकीय व रुग्णालय व्यवसाय, दुकान खरेदी, शैक्षणिक कर्ज,



सूक्ष्म व लघु-मध्यम उद्योग, वाहन तारण, घर दुरुस्ती, सोने तारण व गृहकर्ज अशा विविध योजना सुरू केल्या आहेत. फार्मा व्यावसायिकांना कमी व्याजदरात कर्ज सुविधा, विद्यार्थ्यांसाठी कर्ज मर्यादेत वाढ व व्याजदरात सवलत देण्यात आली आहे. मुलींसाठीही व्याजदरात विशेष सवलत देण्यात आली आहे.

डिजिटल बँकिंगच्या क्षेत्रातही बँकेने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. ग्राहकांना घरपोच दोन ते तीन दिवसांत एटीएम कार्ड मिळण्यासाठी सुविधा सुरू करण्यात आली आहे.सीबीएस व एमआयएस प्रणालीमध्ये सुधारणा, आरटीजीएस व एनईएफटी व्यवहारांमध्ये स्वयंचलित परतावा आणि लाभार्थीच्या नावाची पडताळणी सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. आगामी आर्थिक पाच वर्षाच्या वर्षात एकूण व्यवसायासाठी १० हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, ठेवी वाढीसाठीही महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असल्याचे अध्यक्षा गीतांजलीताई शेळके यांनी स्पष्ट केले.

**महानगराचा शुन्य टक्के एनपीए..**

३१ मार्च २०२६ रोजी बँकेचा निव्वळ अनुत्पादक कर्जाचा दर (नेट एनपीए) शून्य टक्के होता, तर सकल अनुत्पादक कर्जाचा दर (ग्रॉस एनपीए) ९.८५ टक्के होता. कर्ज व्यवसायाची गुणवत्ता कायम ठेवत बँकेचा व्यवसाय अधिक मजबूत करण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न आहे. लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी सुलभ व्याजदरात कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, स्थानिक व्यवसायांचा विस्तार व रोजगार निर्मितीला त्यातून हातभार लागणार आहे. कर्ज प्रक्रिया अधिक जलद व सुलभ करण्यासाठीही आवश्यक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत.






# काळ बदलतोय, शिक्षकांनीही बदलले पाहिजे! : शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे

## ल. ना. होशिंग उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात, सादिक शेख यांचा सेवापूर्तीबद्दल सपत्नीक सन्मान

जामखेड (समर्थ गांवकरी)

ल. ना. होशिंग उच्च माध्यमिक विद्यालय, जामखेड येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांनी शिक्षकांनी काळानुसार स्वतःमध्ये बदल करून माहिती तंत्रज्ञानाच्या युगाशी जुळवून घेण्याचे आवाहन केले. शिक्षकी पेशा हा व्यवसाय नसून एक ध्यास आहे.

समाजात शिक्षकाचे स्थान आजही आबाधित असून, राष्ट्रनिर्मितीमध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पूजा कोल्हे यांनी शिक्षक दिनाचे म हत्त्व विशद करत शिक्षकी पेशा हा केवळ व्यवसाय नसून विद्यार्थ्यांचे जीवन घडविण्याचा ध्यास आहे, असे सांगितले.

कार्यक्रमास शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, संचालक डॉ. प्रताप गायकवाड, गटशिक्षणाधिकारी धनंजय बोंदार्डे, प्राचार्य बी. ए. पारखे, उपप्राचार्य युवराज भोसले, पर्यवेक्षक सुदाम वराट, पत्रकार नासीर पठाण, सर्फराज पठाण, सतीश डुचे, गायवळ सर, एकदिवसीय प्राचार्य सुजित टेकाळे, उपप्राचार्य गायत्री जाधव आदी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी साकारल्या शिक्षकांच्या भूमिका

शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी शाळेतील विविध शिक्षकांच्या भूमिका साकारत एक दिवसासाठी शिक्षकाची जबाबदारी सांभाळली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या अध्यापनशैलीचे अनुकरण करत वर्गात अध्यापन केले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### ३४ वर्षांच्या सेवेनंतर सादिक शेख सरांचा सपत्नीक सन्मान

विद्यालयात तब्बल ३४ वर्षे सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले सादिक शेख सर यांचा सेवापूर्ती निमित्त सपत्नीक सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सादिक शेख यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला. भैरवनाथ विद्यालय, हळगाव येथे दोन वर्षे सेवा करताना तेथील कुस्तीपटूंनी राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली, अशी आठवण त्यांनी सांगितली.

### खडू-फळ्यापासून माहिती तंत्रज्ञानाच्या युगापर्यंत बदल स्वीकारा

शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे म्हणाले, पूर्वी खडू आणि फळा हे अध्यापनाचे प्रमुख साधन होते. आता माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. उपलब्ध माहितीचा केवळ संग्रह न करता तिचा ज्ञानामध्ये उपयोग करणे गरजेचे आहे. शिक्षकांनीही काळाबरोबर बदलले पाहिजे.

ते पुढे म्हणाले, विद्यार्थी वर्गात न येता केवळ अॅकॅडमीमध्ये शिकतात, ही एक प्रकारची समस्या आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शाळा आणि शिक्षकांना पर्याय नाही. ल. ना. होशिंग विद्यालयात विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती ही निश्चितच कौतुकाची बाब आहे.

कार्यक्रम जसा दर्जेदार झाला, तसाच अभ्यास करून आपले जीवन आणि करिअरही दर्जेदार करा, असा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### १९७५ मध्ये याच शाळेत मुख्याध्यापकाची भूमिका बजावली

संचालक डॉ. प्रताप गायकवाड यांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देताना सांगितले की, १९७५ साली याच शाळेत मी मुख्याध्यापक म्हणून भूमिका बजावली होती. विद्यालयाशी असलेले जुने नाते आणि शैक्षणिक कार्याचा प्रवास त्यांनी यावेळी सांगितला.

### अकरावी-बारावीचे वर्ष अत्यंत महत्त्वाचे

गटशिक्षणाधिकारी धनंजय बोंदार्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अकरावी-बारावी हे आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचे वर्ष असल्याचे सांगितले. या काळात प्रामाणिकपणे मेहनत करा आणि उज्ज्वल भवितव्य घडवा. सुरुवातीपासून अभ्यासाची सवय लावली तर आयुष्य सिंहासारखे जगता येते; अभ्यासाकडे दुर्लक्ष केले तर भविष्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, असे त्यांनी स्पष्ट केले.

### राष्ट्रनिर्मितीचे काम शिक्षकच करतात

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य बी. ए. पारखे म्हणाले, समाजाला दिशा देण्याचे काम शिक्षक करत आहेत. राष्ट्रनिर्मितीचे काम शिक्षकांच्या माध्यमातून घडते. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देऊन त्यांना योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करतात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनवडे आकांक्षा, अदिती शिंदे आणि विनोद धुमाळ यांनी केले. कार्यक्रमात शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवरांचा उत्स्फूर्त सहभाग होता. शिक्षक दिनाच्या निमित्ताने विद्यालय परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.



**विद्यालयातील कला शिक्षक मुकुंद राऊत यांनी शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांना अहिल्यादेवी होळकर जन्मस्थानचे पेन ड्राइंग चित्र सप्रेम भेट दिले. मोरे साहेब यांनी अकरावी व बारावी कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी शनिवारी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन वर्ग सुरू करावे असे आवाहन केले.**

# महिलांनी स्वावलंबी होण्यासाठी 'महिला उद्योजक मेळावा २०२६' महिलांना नाव नोंदणी करण्याचे आवाहन

## निलेश लंके प्रतिष्ठान राबविणार उपक्रम; सोनिया राजदेव यांची माहिती

पारनेर (समर्थ गांवकरी)





महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, नवीन व्यवसाय सुरू करून उद्योग क्षेत्रात पुढे यावे, या उद्देशाने 'महिला उद्योजक मेळावा २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. खासदार डॉ. निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश लंके प्रतिष्ठान व कौशल्य विकास अभियान, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या मेळाव्यात महिलांना विविध व्यवसायांच्या संधी, व्यवसाय सुरू करण्याची प्रक्रिया, शासकीय योजना, बँक कर्ज व सबसिडी, बाजारपेठेची उपलब्धता तसेच डिजिटल मार्केटिंग याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अनुभवी तज्ज्ञांकडून प्रशिक्षण व मार्गदर्शनासोबतच व्यवसाय नेटवर्किंग, मार्केट लिंकिंग आणि उद्योगासाठी आवश्यक प्रशिक्षणाची माहितीही देण्यात येणार आहे.

शिलाईकाम व फॅशनमधील विविध उत्पादने, अगरबत्ती व सुगंधी वस्तू, मेणबत्ती निर्मिती, पापड-लोणचे-मसाले, आर्टिफिशियल ज्वेलरी, फुलांची सजावट, ब्युटी पार्लर, केटरिंग, सॅनिटरी नॅपकिन, डिजिटल प्रिंटिंग, घरगुती नॅपकिन तसेच फूड प्रोसेसिंग यांसारख्या विविध उद्योगांच्या संधींबाबत महिलांना माहिती दिली जाणार आहे.

महिला बचत गट तसेच स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असलेल्या महिलांना या मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. मेळाव्यासाठी नाव नोंदणी करावी

अधिक माहितीसाठी ९९२२७७०८५७ व ९८५०४७१०७५ या क्रमांकांवर संपर्क साधावा. नावनोंदणीसाठी टाकळी ढोकेश्वर येथील रवींद्र राजदेव यांच्या जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी टाकळी ढोकेश्वर गटाच्या महिला नेत्या सोनिया रवींद्र राजदेव यांनी केले आहे.

# सिद्धेश्वरवाडीत श्रावणातील चारही सोमवार भक्तिमय वातावरणात संपन्न

## शिवपुराण कथा, वैदिक व संगीत कार्यक्रम, कलगी-तुरा आणि कीर्तनाची पर्वणी; पारनेर व परिसरातील हजारो भाविकांनी घेतले श्री सिद्धेश्वराचे दर्शन

पारनेर (समर्थ गांवकरी)

श्रावण महिन्यानिमित्त सिद्धेश्वरवाडी येथील श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चारही सोमवारचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमांना पारनेर शहरासह तालुक्यातील विविध गावांमधून तसेच परिसरातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहिले. भाविकांनी श्री सिद्धेश्वर महादेवाचे दर्शन घेत विविध धार्मिक कार्यक्रमांचा आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्रावणातील पहिल्या सोमवारी शिवपुराण कथा, संगीत व प्रवचनाचा कार्यक्रम झाला. ह.भ.प. किरण महाराज भागवत यांनी शिवपुराण कथेच्या माध्यमातून भगवान शिवाची महती, भक्तीचे महत्त्व आणि आध्यात्मिक विचार भाविकांसमोर मांडले.

दुसऱ्या सोमवारी वैदिक व संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाहीर बाळासाहेब बोरुडे यांनी आपल्या सादरीकरणातून उपस्थित भाविकांचे प्रबोधन व मनोरंजन केले. तिसऱ्या सोमवारी पारंपरिक कलगी-तुऱ्याचा कार्यक्रम रंगला. मच्छिंद्र लायगुडे, कलगीवाले, आंबेगाव तसेच स्वप्निल गायकरवाड, तुरेवाले, बेल्हा यांनी सहभाग घेतला.

श्रावणातील चौथ्या सोमवारी सकाळी ह.भ.प. तुषार महाराज पावळे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. कीर्तनातून धार्मिक तसेच सामाजिक संदेश देत त्यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले. या कीर्तनाने चारही सोमवारच्या धार्मिक कार्यक्रमांची भक्तिमय सांगता झाली.



चारही सोमवारच्या कार्यक्रमांमध्ये भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दर्शनासाठी सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी पाहायला मिळत होती. शिवनामाचा जयघोष, धार्मिक कार्यक्रम आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण सिद्धेश्वरवाडी परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

सिद्धेश्वरवाडी येथील श्री सिद्धेश्वर मंदिर हे पारनेर तालुक्यातील महत्त्वाचे धार्मिक श्रद्धास्थान असून अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत पर्यटन माहितीतही मंदिराचा समावेश आहे. श्रावण महिन्यात येथे भाविकांची विशेष गर्दी होत असते.

श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट कमिटी, सिद्धेश्वरवाडी यांच्या नियोजनातून पार पडलेल्या या उपक्रमासाठी ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. श्रावणातील चारही सोमवारच्या कार्यक्रमांमुळे सिद्धेश्वरवाडी परिसरात संपूर्ण महिनाभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

# लांडेवस्ती प्रशालेस आदर्श शाळा पुरस्कार

वैजापुर (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद प्रशाला लांडेवस्ती या शाळेस यावर्षीचा जिल्हा आदर्श शाळा पुरस्कार मिळाला. संत एकनाथ रंग मंदिरात आयोजित केलेल्या या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री ना. संजय शिरसाठ, ओबीसी मंत्री अतुल सावे, आमदार सुहास शिरसाठ, उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल शिक्षण सभापती अनिता मोठे बांधकाम सभापती सचिन गरड , समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के, ज्ञानेश्वर मोठे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे, माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी आश्विनी लाटकर यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी उत्कृष्ठ गुणवत्ता देणाऱ्या शाळांना शिक्षक दिनाचे औचित्य साधून जिल्हा आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला यामध्ये वैजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला लांडेवस्ती या शाळेची निवड करण्यात आली होती त्यामुळे वरिल मान्यवरांच्या उपस्थितीत लांडेवस्ती प्रशालेस आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी पुरस्कार स्विकारतांना शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजी लांडे, उपाध्यक्ष भरत गोरसे मुख्याध्यापक सुमेध सरकटे , प्रविण म्हस्के यांची उपस्थिती होती. जिल्हा परिषद प्रशाला लांडेवस्ती प्रशालेची गुणवत्ता नेहमीच चांगली असते शाळा व्यवस्थापन पालक वर्ग शाळेच्या विकासासाठी नेहमीच सकारात्मक भूमिका ठेवत असतात मुलांची गुणवत्ता वाढविण्यासाठी व मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशालेतील मुख्याध्यापक सुमेध सरकटे, सहशिक्षक प्रविण म्हस्के, श्रीमती वैशाली सुराशे, श्रीमती



राजपूत हे शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन, मी ज्ञानी होणार आदि स्पर्धा परिक्षेची तयारी करून घेतली जाते. या प्रशालेस जिल्हा आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर , मनिष दिवेकर, पंचायत समिती सदस्य राहुल लांडे , शालेय समिती अध्यक्ष शिवाजी लांडे, उपाध्यक्ष भरत गोरसे, जगन्नाथ त्रिभुवन, नानासाहेब जाधव, नारायन साळुंखे, विशाल साळुंखे, बाबासाहेब लांडे यासह ग्रामस्थ व अनेकांनी अभिनंदन केले.

# कै. संतु बजाबा काळे यांचे वृद्धापकाळाने निधन !

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील बहिरवाडी येथील कै. संतु बजाबा काळे यांचे सोम वार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी दुःखद निधन झाले. चित्तळवेढे येथिल लताबाई उर्फ जनाबाई आनंदराव आरोटे यांचे ते बंधू होत त्यांच्या पार्थिवावर व प्रवरातिरावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या अंत्यविधी समय राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांच्या निधनाने काळे परिवारासह नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांमध्ये शोककळा पसरली आहे.

कै. संतु बजाबा काळे यांच्या दशक्रिया विधीचा कार्यक्रम आज बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता मेहेंदुरी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी ह.भ.प. पांडुरंग महाराज फरगडे, मेहेंदुरी यांचे प्रवचन होणार आहे.

कै. संतु बजाबा काळे यांच्या पश्चात पत्नी शेवंताबाई, मुलगा अशोक व मोहन, सुना, नातवंडे, भाऊ, तिन बहिणी असा मोठा परिवार आहे. असा जन्म लाभावा, देहाचा चंदन व्हावा । गंध संपला तरी,



सुगंध दरवळत राहावा ।। या भावपूर्ण शब्दांत समस्त काळे परिवार व ग्रामस्थ बहिरवाडी यांच्या वतीने श्रद्धांजली व्यक्त करण्यात आली आहे.

# ताजनापूर लिफ्टच्या शिल्लक पाण्यातून शेवगाव तालुक्यातील २८ गावांना हक्काचे पाणी द्या

## सर्वपक्षीय कृती समितीची कार्यकारी अभियंता व जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी; अन्यथा व्यापक जनआंदोलनाचा इशारा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जायकवाडी धरणाच्या निर्मितीसाठी शेवगाव तालुक्याने केलेल्या त्यागाची योग्य भरपाई म्हणून तालुक्याच्या हक्काचे पाणी पूर्व भागातील दुष्काळी गावांना मि ळावे, या मागणीने पुन्हा जोर धरला आहे. ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. १ साठी राखीव असलेल्या शिल्लक पाण्यातून शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील २८ गावांमधील तलाव, बंधारे, नालाबंडिंग व पाणलोट क्षेत्र वर्षातून चार वेळा भरून देण्यात यावे. ही मागणी पूर्ण केल्याशिवाय ताजनापूर लिफ्टचे शिल्लक पाणी अन्य कोणत्याही तालुक्यासाठी देऊ नये, अशी ठाम भूमिका ताजनापूर लिफ्ट सर्वपक्षीय कृती समितीने घेतली आहे.

या मागणीचे निवेदन कृती समितीचे अध्यक्ष ड. शिवाजीराव काकडे व सौ. हर्षदा काकडे यांच्या नेतृत्वाखाली ताजनापूर मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश पाटील तसेच जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना देण्यात आले.

शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा शेवगाव तालुक्यातील शेतकरी व ग्रामस्थांना सोबत घेऊन व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा कृती समितीने दिला आहे.

### जायकवाडीच्या निर्मितीसाठी २९ गावांचा त्याग..

निवेदनात म्हटले आहे की, जायकवाडी धरणाच्या निर्मितीपूर्वी शेवगाव तालुक्याच्या उत्तरेकडील गोदावरी नदीलगत २९ गावे व येथील सुपीक जमीन धरणाच्या निर्मितीसाठी शासनाने संपादित केली.

या २९ गावांच्या विस्थापनाच्या पार्श्वभूमीवर शेवगाव तालुक्यातील शेतकरी व सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी ड. आबासाहेब काकडे यांच्या नेतृत्वाखाली १९६५ ते १९७८ या कालावधीत सातत्याने संघर्ष केला. या लढ्यात अनेक कार्यकर्ते व शेतकऱ्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. या संघर्षातून शेवगाव तालुक्यासाठी जायकवाडी धरणात ३.८ टीएमसी पाणी राखीव ठेवण्यात आले. पुढे ताजनापूर योजनेचे ताजनापूर टप्पा क्र. १ आणि टप्पा क्र. २ असे दोन भागात विभाजन करण्यात आले. टप्पा क्र. १ साठी १.६१ टीएमसी अर्थात ४३ द.ल.घ.मी. तर टप्पा क्र. २ साठी २.२६७ टीएमसी अर्थात ६४.२० द.ल.घ.मी. पाणी राखीव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सन १९९९ पासून ड. शिवाजीराव काकडे यांच्या नेतृत्वाखाली शेवगाव तालुक्यातील दुष्काळी भागाला हे पाणी मिळावे यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. या संघर्षानंतर एप्रिल २००७ मध्ये २८ गावांच्या सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आले होते. मात्र, जलसंपदा विभागाने ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. २ मध्ये केवळ १७ गावांचा समावेश केल्याने उर्वरित गावांचा पाण्याचा प्रश्न अद्याप कायमच आहे.

ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. १ साठी राखीव असलेल्या पाण्यातून प्रत्यक्ष वाटपानंतरही काही पाणी शिल्लक आहे. जलसंपदा विभागाने 'वाल्मी', छत्रपती संभाजीनगर या संस्थेमार्फत या योजनेचा तांत्रिक अभ्यास व अहवाल तयार केला असून

या तांत्रिक अभ्यासानुसार उपलब्ध पाण्यातून प्रत्यक्ष पाणीवाटप केल्यानंतरही शिल्लक पाण्याचा उपयोग शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील दुष्काळी गावांसाठी करता येऊ शकतो, असा समितीचा दावा आहे. त्यामुळे हे पाणी अन्यत्र वळविण्याऐवजी शेवगावच्या २८ गावांमधील जलसाठे भरण्यासाठी वापरावे, अशी मागणीही कृती समि तीच्या वतीने करण्यात आली आहे.





### २८ गावांच्या जलसाठ्यांना पाणी देण्याची मागणी

चेडेचांदगाव, बेलगाव, सुळे पिंपळगाव, अंतरवाली खु, अंतरवाली बु, शिंगोरी, राणेगाव, कोनोशी, शोभानगर, आधोडी, दिवटे, गोळेगाव, लमानतांडा, नागलवाडी, शेकटे खुर्द, लाडजळगाव, बाडगव्हाण, मुरमी, शेकटे बु, बालमटाकळी, गायकवाड जळगाव, सुकळी, बोधेगाव, सोनविहीर, ठाकूर पिंपळगाव, लखमापुरी, कांबी आणि हातगाव आदी २८ गावांतील तलाव, बंधारे, नालाबंडिंग तसेच पाणलोट क्षेत्र भरून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या भागातील बहुतांश जमीन खडकाळ व डोंगराळ आहे. पावसाचे प्रमाणही कमी असल्याने शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. या परिसरातील शेतकरी, ऊसतोडणी कामगार, भूमिहीन व अल्पभूधारक कुटुंबांना पाण्याच्या उपलब्धतेअभावी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. हक्काचे पाणी उपलब्ध झाल्यास शेती उत्पादन वाढण्याबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात राष्ट्रीय उद्योजकता दिन साजरा



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा (प्रतिनिधी) रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय उद्योजकता दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय उद्योजकता दिनानिमित्त पोस्टर प्रदर्शन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संदीप अभंग उपस्थित होते. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची आवड निर्माण व्हावी, नवकल्पनांना प्रोत्साहन मिळावे आणि विद्यार्थ्यांनी रोजगार शोधणारे न राहता रोजगार निर्माण करणारे बनावे. असे विचार त्यांनी मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.प्रकाश साळवे होते. यावेळी त्यांनी उद्योजकतेचे महत्त्व, व्यवसायातील संधी, नवकल्पना, जोखीम स्वीकारण्याची क्षमता आणि आत्मनिर्भरतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रदर्शनातून नवकल्पना सादरीकरण व प्रश्नोत्तराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध व्यवसाय कल्पना मांडल्या.

पाहुण्यांचे स्वागत व मनोगत अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुदाम भुजबळ यांनी केले. प्रास्ताविक प्रा. वैशाली घोडके यांनी केले. या समारंभ प्रसंगी प्रो.डॉ. राजेंद्र ठाकरे, प्रो.डॉ. राजाराम कानडे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन दिव्या मांडे व चैताली चाकणे यांनी केले.आभार प्रा. सिद्धार्थ बर्वे यांनी मानले.

## पारनेरचा पश्चिम-पूर्व भाग कोरडाच; परतीच्या पावसाची आस

पारनेर (समर्थ गांवकरी)

राज्यातील अनेक भागांत मागील महिन्यात पावसाने दमदार हजेरी लावत शेतकऱ्यांना दिलासा दिला असला, तरी अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात मात्र अद्याप अपेक्षित पाऊस झालेला नाही. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी चिंतेत असून, आता सर्वांच्या नजरा परतीच्या पावसाकडे लागल्या आहेत. पारनेर तालुक्याच्या पूर्व आणि पश्चिम भागात पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्याने अनेक ठिकाणी पिकांची अवस्था बिकट झाली आहे. पठार भागातील काही गावांमध्ये विहिरींची पाणीपातळी झपाट्याने खालावली असून काही विहिरी कोरड्या पडल्या आहेत. वाड्या-वस्त्यांवर पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची गरज भासण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तालुक्यातील बहुतांश शेती कोरडवाहू असून ती प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. सध्या सोयाबीन, बाजरी, मूग, वाटाणा यांसह विविध पिके अंतिम टप्प्यात आहेत. मात्र पावसाने ओढ दिल्याने ही पिके जळून जाण्याच्या मार्गावर आहेत. आणखी काही दिवस पाऊस झाला नाही तर शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. पारनेरचा डोंगरी व दुष्काळी पट्टा म्हणून असलेला लौकिक यंदाही कायम राहण्याची चिन्हे दिसत आहेत. तालुक्यातील ओढे, नाले, तलाव अद्याप कोरडेच असल्याने भविष्यातील पाणीटंचाईची चिंता वाढली आहे. आता परतीच्या पावसाने दमदार हजेरी लावून पिकांना आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा बळीराजा व्यक्त करीत आहे.



## मॉडर्न हायस्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उत्साहात

### पुरुषोत्तम मलगुंडे व रिद्धी वैद्य विजयी!



अकोले (समर्थ गांवकरी)

मॉडर्न हायस्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी (जी.एस.) व विद्यार्थिनी प्रतिनिधी (एल.आर.) पदासाठीची निवडणूक प्रक्रिया उत्साही आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. उमेदवारी अर्ज भरणे, माघार घेणे, चिन्ह वाटप, प्रचारसभा तसेच मतदान या सर्व प्रक्रिया विद्यार्थ्यांनीच पार पाडल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मतदान करत लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या निवडणुकीत विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून पुरुषोत्तम प्रशांत मलगुंडे, तर विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून रिद्धी सचिन वैद्य यांची बहुमताने निवड झाली. निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात व घोषणाबाजी करत नूतन जी.एस. व एल.आर. यांचे अभिनंदन केले.

# जनता दरबार ठरतोय सर्वसामान्यांच्या प्रश्नांचे थेट व्यासपीठ; श्रीगोंदेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी थेट ऐकून त्या संबंधित शासकीय यंत्रणेमार्फत मार्गी लावण्याच्या उद्देशाने आमदार विक्रमदादा बबनराव पाचपुते यांनी श्रीगोंद्यात सुरू केलेला 'जनता दरबार' नागरिकांसाठी विश्वासाचे आणि समस्या निराकरणाचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. माऊली संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या या जनता दरबाराला तालुकाभरातून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आपल्या समस्या थेट आमदारांसमोर मांडण्याची संधी मिळत असल्याने समाधानाचे वातावरण दिसून येत आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी महसूल, ग्रामविकास, वीज, पाणीपुरवठा, शेती, सिंचन आदी विभागांच्या कार्यालयांत वारंवार हेलपाटे मारावे लागतात. कोणत्या विभागाकडे जावे, कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत किंवा अर्जाची स्थिती काय आहे, अशा अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ही परिस्थिती लक्षात घेऊन नागरिक आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद घडवून आणण्यासाठी जनता दरबाराची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यात आली आहे.

यावेळी तालुक्यातील विविध गावांतील नागरिकांनी रस्ते, पाणीपुरवठा, वीज, महसूल, शेती, सिंचन, ग्राम विकास, सामाजिक योजना, शासकीय दाखले, विविध विकासकामे तसेच वैयक्तिक स्वरूपाच्या अडचणी आमदार पाचपुते यांच्यासमोर मांडल्या.

आमदार पाचपुते यांनी प्रत्येक नागरिकाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून जागेवरच माहिती घेतली. तातडीने मार्गी लावता येणाऱ्या प्रश्नांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. त्यामुळे नागरिकांना पुन्हा-पुन्हा शासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारण्याची वेळ येऊ नये, यासाठी प्रशासनाला थेट जबाबदार करण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र दिसून आले.

जनता दरबाराच्या माध्यमातून अनेक प्रश्न संबंधित अधिकाऱ्यांशी थेट चर्चा करून मार्गी लागत असल्याने या उपक्रमाबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. आमदारांसमोर थेट प्रश्न मांडणे, त्याचवेळी अधिकाऱ्यांकडून माहिती घेणे आणि आवश्यक सूचना देण्याच्या पद्धतीमुळे प्रश्नांच्या निराकरणाला गती मिळत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि सर्वसामान्य जनता यांच्यातील थेट संवाद ही लोकशाही व्यवस्थेची महत्त्वाची गरज असून, जनता दरबाराच्या माध्यमातून हा संवाद अधिक प्रभावी होत असल्याचे दिसून येत आहे. एका बाजूला नागरिकांना आपली अडचण थेट मांडण्याची संधी मिळत आहे, तर दुसऱ्या बाजूला संबंधित अधिकारीही नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यावर कार्यवाही करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होत आहेत.

जनता दरबार नियमित सुरू राहणार : आमदार विक्रमदादा पाचपुते

नागरिकांचा वाढता प्रतिसाद आणि अनेक प्रश्नांना मिळणारी गती लक्षात घेता जनता दरबार यापुढेही नियमितपणे सुरू ठेवण्यात येणार असल्याचे



आमदार विक्रमदादा पाचपुते यांनी स्पष्ट केले. नागरिकांना अनावश्यक हेलपाटे मारावे लागू नयेत, त्यांच्या कामांची वेळेत दखल घेतली जावी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी हा थेट संवाद सातत्याने सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. जनतेच्या दारात शासन आणि शासनासमोर जनतेचा थेट आवाज ही भूमिका या उपक्रमातून प्रत्यक्षात येत असल्याने श्रीगोंदेकरांकडून या उपक्रमाचे स्वागत होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# अकोल्यात आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातर्फे महारुद्र पूजा व सत्संग उत्साहात

## स्वामी मुकुंदजी टंडन यांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात धार्मिक सोहळा

अकोले (समर्थ गांवकरी)

श्रावण मासाचे औचित्य साधून अकोले येथील महालक्ष्मी मंदिर, येथे आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार, अकोले यांच्या वतीने महारुद्र पूजा व सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी झालेल्या या कार्यक्रमास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वामी मुकुंदजी टंडन यांच्या हस्ते, ओंकारेश्वर आश्रम येथील पंडितांच्या मंत्रोच्चारात तसेच अकोले तालुक्याचे आमदार किरण लहामटे यांच्या उपस्थितीत महारुद्र पूजा विधी संपन्न झाला. वेदमंत्रांचा निनाद, रुद्राभिषेक, पूजाविधी आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण मंदिर परिसर शिवमय झाला होता. श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक ऊर्जेने भारलेल्या या वातावरणाचा उपस्थित भाविकांनी मनःपूर्वक आनंद घेतला.

यावेळी मार्गदर्शन करताना मुकुंदजी टंडन स्वामी यांनी रुद्रपूजेचे आध्यात्मिक महत्त्व, मनःशांती, सकारात्मक विचार आणि जीवनातील संतुलनासाठी साधना व सत्संगाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. रुद्रपूजा ही केवळ धार्मिक विधी नसून अंतर्मनातील सकारात्मक ऊर्जा जागृत करणारी आणि समाजात शांतता व सद्भावना निर्माण करणारी साधना असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान सत्संग, भजन व आध्यात्मिक वातावरणाची अनुभूती उपस्थितांना मिळाली. आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातील साधक, अनुयायी, सेवेकरी तसेच अकोले शहर व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वामी कल्याणानंदजी, ज्येष्ठ प्रशिक्षक सुधाकर शेटे, प्रकाश सुर्वे, सविता सुर्वे, सुमन डमाले, शिवम धुमाळ, सखाराम मेसे, अनिता मेसे, अशोक शिंदे, भाऊसाहेब गुंजाळ,प्रकाश सोनवणे, मिनाकुमारी सोनवणे, आदेश माने, मच्छिंद्र करवंदे, निवृत्ती कदम, मंगेश देशमुख, उज्वला घाणे, श्रीकांत देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

**आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जातात. त्यांचा तालुक्यातील सर्व साधकांनी वेळोवेळी लाभ घ्यावा व आपले मानसिक, आध्यात्मिक, आणि शारीरिक आरोग्य संवर्धन करावे, असे आवाहन साधक प्रा. चंद्रशेखर हासे यांनी केले.**

श्रावण मासातील महारुद्र पूजा व सत्संगाच्या माध्यमातून भक्ती, साधना, सेवा आणि सकारात्मक विचारांचा संदेश देत अकोले परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. उपस्थित भाविकांनी या उपक्रमाचे स्वागत करून आयोजकांचे अभिनंदन केले.

# मनापासून देवाचा धावा करा; देव भक्ताच्या हाकेला धावून येतो! : ह.भ.प. श्यामसुंदर ढवळे महाराज



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

संतांची सेवा करा, संतांचे दर्शन घ्या आणि मनापासून देवाची भक्ती करा. श्रद्धेने केलेल्या भक्तीला देव नक्कीच पावतो. भक्ताने अंतःकरणातून देवाचा धावा केला, तर देव त्याच्या हाकेला धावून येतो, असे प्रतिपादन ह.भ.प. श्यामसुंदर ढवळे महाराज यांनी केले. श्रीगोंदा तालुक्यातील ठाणगेवाडी येथील श्री संत बाळूमामा देवस्थान येथे श्रीकृष्ण प्रकट दिनानिमित्त आयोजित हरिकीर्तन सेवेत ते बोलत होते. ढवळे महाराज म्हणाले, देवाच्या भक्तीत श्रद्धा आणि विश्वास अत्यंत महत्त्वाचा आहे. केवळ परंपरा म्हणून भक्ती न करता ती अंतःकरणातून केली पाहिजे. मनापासून केलेली भक्ती आणि संतांची सेवा जीवनाला खरे समाधान देतात. संत समाजाला सुख, शांती आणि सदाचाराचा मार्ग दाखविण्याचे कार्य करतात. ठाणगेवाडी हे प्रति आदमापूर क्षेत्र म्हणून ओळखले जात असून संत बाळूमामा यांच्या पावन भूमीला समृद्ध संतपरंपरेचा आध्यात्मिक वारसा लाभला आहे. या पवित्र भूमीचे महत्त्व ओळखून प्रत्येकाने संतांचे दर्शन, सेवा आणि त्यांच्या विचारांचे आचरण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# कर्जाचे हप्ते थकले, मुलांच्या फीची अडचण

## दोन महिने झाले तरी पगार नाही; कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांचे कंबरडे मोडले

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

दिवस-रात्र जीव धोक्यात घालून अल्प पगारावर काम करणाऱ्या कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांवर आता आर्थिक संकटाची मोठी कुऱ्हाड कोसळली आहे. दर महिन्याला ठराविक तारखेला बँक खात्यात जमा होणारा पगार दोन महिने उलटूनही जमा न झाल्याने वीज कंत्राटी कामगारांमध्ये तीव्र नाराजी आणि चिंता व्यक्त होत आहे.

महिन्याच्या सुरुवातीलाच घरखर्च, मुलांच्या शाळा-कॉलेजची फी, वृद्ध आई-वडिलांच्या औषधोपचारांचा खर्च, घरकर्ज, वाहनकर्ज तसेच वैयक्तिक कर्जाचे हप्ते अशा अनेक आर्थिक जबाबदाऱ्या कर्मचाऱ्यांसमोर उभ्या असतात. मात्र, पगार वेळेवर जमा न झाल्याने या सर्व आर्थिक गणिताचा ताळमेळ बिघडला आहे. अनेक वीज कंत्राटी कर्मचाऱ्यांनी घरगुती गरजा भागविण्यासाठी तसेच विविध कारणांसाठी घेतलेली कर्जे आणि बँकेच्या ईएमआयची रक्कम खात्यात पैसे नसल्यामुळे थकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वेळेत हप्ता न भरल्यास बँकेकडून अतिरिक्त दंड व भुर्दंड सहन करावा लागू शकतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर आर्थिक ताण अधिकच वाढत आहे.

आम्ही वेळेवर कर्तव्य बजावतो, मग आमचा पगार वेळेवर का नाही? असा संतप्त सवाल कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. पगाराच्या विलंबामुळे कर्मचाऱ्यांच्या मानसिक तणावातही वाढ होत असल्याचे चित्र आहे.

# रात्रीच्या घरफोड्यांचा छडा; ६.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

मंचर (समर्थ गांवकरी)

घोडेगाव परिसरात रात्रीच्या घरफोड्या करणाऱ्याचा छडा लागला असून एका आरोपीकडून सहा गुन्ह्यातीलसहा लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यास पोलिसांना यश आले. अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार यांनी दिली.

घोडेगाव परिसरात रात्रीच्या वेळी बंद घरांचे दरवाजे तोडून घरगुती भांडी, बंब, शेगडी व इतर साहित्य चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण व घोडेगाव पोलिसांनी तपास सुरू केला.

स्थानिक गुन्हे शाखा चे

पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून टेम्पोचा वापर करून चोरी केल्याचे निष्पन्न झाले. सदर टेम्पोचा शोध घेत असताना तो जुन्नर तालुक्यातील पंचलिंगवस्ती येथे असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयित इसमाला टेम्पोसह ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव शहाजी ज्ञानदेव सोनवणे



घरफोडीच्या घटनांवर स्थानिक गुन्हे शाखा पुणे आणि घोडेगाव पोलिसांचे बारकाईने लक्ष होते. सीसीटीव्ही आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात यश आले. आरोपी कडून सहा गुन्हे उघडकीस आले असून चोरीचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. तपास पुढे सुरू आहे. महादेव शेलार सहाय्यक पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा.

(वय २४, रा. पंचलिंगवस्ती, जुन्नर, जि. पुणे) असे सांगितले. विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीकडून एकूण सहा गुन्हे उघडकीस आणत ६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास घोडेगाव पोलीस करीत आहेत.

# 'एका विद्यार्थ्यासाठी एक बेंच, माझे अभिमानास्पद पालकत्व' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिंदेवाडी शाळेला लोकसहभागातून ४० बेंचचे लोकार्पण; आठवडाभरात ६८ हजारांचा निधी संकलित

अकोले (समर्थ गांवकरी)

'एका विद्यार्थ्यासाठी एक बेंच, माझे अभिमानास्पद पालकत्व' या अभिनव उपक्रमाला माजी विद्यार्थी, ग्रामस्थ व दात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अवघ्या आठवडाभरात ₹६८ हजारांचा निधी उभारला. या लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या ४० बेंचचे लोकार्पण गणोरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी येथे पोषण महा सप्ताह व दहीहंडी कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शाळेच्या उपक्रमशील मुख्याध्यापिका वृषाली सुनील कडलग यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ₹१,७०० किमतीचा एक बेंच - 'माझे अभिमानास्पद पालकत्व' अशी संकल्पना मांडली. यासाठी त्यांनी खच्या मदतीने आकर्षक जनजागृती प्रतिमा तयार करून ती माजी विद्यार्थी तसेच गावातील व्हॉट्सप ग्रुपवर शेअर केली आणि विद्यार्थ्यांसाठी बेंच देण्यासाठी देणगीचे आवाहन केले.

या आवाहनाला सर्वप्रथम उत्स्फूर्त प्रतिसाद देत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिगंबर दातीर यांचे बंधू रामकृष्ण दातीर यांनी स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात आपल्या आई संजीवनी यांच्या हस्ते ₹२० हजारांची देणगी मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांच्याकडे सुपूर्त केली. त्यांचा हा पुढाकार पाहून माजी विद्यार्थी व ग्रामस्थही पुढे सरसावले आणि अवघ्या आठवडाभरात ₹६८ हजारांचा निधी जमा झाला.

दरम्यान, शाळेत दहीहंडी व पोषण महा सप्ताहाचा कार्यक्रम सुरू असतानाच विद्यार्थ्यांसाठी बेंच घेऊन ट्रक शाळेत दाखल झाला. बेंच पाहताच विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. लोकसहभागातून उभ्या राहिलेल्या या उपक्रमाने 'माझी शाळा, माझी जबाबदारी' ही भावना अधिक दृढ केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खिरवीरे बीटचे विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर माळवे उपस्थित होते. यावेळी देवठाण बीटचे विस्तार अधिकारी अनिल गायकवाड, केंद्रप्रमुख उत्तम गायकवाड, बालरोगतज्ज्ञ डॉ. नीलम शिंदे, डॉ. दिपाली पानसरे, स्नेहलता कडलग यांच्यासह अनेक




मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापिका वृषाली सुनील कडलग यांनी प्रास्ताविकातून खच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या बेंच उपक्रमाची संकल्पना, लोकसहभागातून झालेला शाळेचा विकास, उड्ढ्या माध्यमातून झालेली भौतिक प्रगती तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. रवींद्रनाथ टागोर यांच्या पणती या कवितेत सांगितल्याप्रमाणे पणती तेवत राहिली तर प्रकाशाने अंधःकार भेदला जातो यावरील समाजमनाचा विश्वास अधोरेखित करण्याचे काम या प्रकल्पाने केले आहे असेही मुख्याध्यापिका कडलग यांनी सांगितले.

महाराष्ट्र जिजाऊ ब्रिगेड, संगमनेरच्या सदस्य डॉ. दिपाली पानसरे, डॉ. नीलम शिंदे व स्नेहलता कडलग यांच्या वतीने शाळेसाठी टेबल व सहा खुर्च्या भेट देण्यात आल्या. तसेच 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत महिलांना केशर आंब्याची ५१ रोपे वितरित करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### नेतवड येथे लहान मुल पळवणारी टोळी आली असल्याची अफवा

शिवनेरी (समर्थ गांवकरी)

नेतवड येथे दहीहंडी कार्यक्रम चालु असताना कार्यक्रमाच्या ठिकाणी दिड वर्षाचा मुलगा खेळत असताना, गर्दीच्या ठिकाणी येवुन एक अनोळखी महीला आली. सदरच्या मुलाचे अपहरण करून घेवुन जात असल्याचे मुलाच्या आजीच्या लक्षात आले. त्यानंतर सदरच्या मुलास त्याच्या आजीने ताब्यात घेतले. त्यानंतर सदरची महीला एका लाल स्विफ्ट रंगाच्या गाडीत बसुन जुन्नर बाजुकडे निघुन गेली. अशी माहिती प्रभारी पोलिस अधिकारी. ज्ञानेश्वर बाजगीरे यांना समजली . त्यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन तात्काळ दोन पोलीस पथके तयार करून सदरच्या महीलेचा शोध घेण्यास सुरूवात केली. पोलीस स्टेशनच्या दोन्ही पथकाने ओतूर, जुन्नर व आजुबाजुच्या भागातील ४० पेक्षा जास्त सी.सी.टी. व्ही. कॅमेरे चेक करून सदरची महीला ज्या गाडीत बसुन गेली होती त्या गाडीचा शोध घेतला. सदरची गाडी जुन्नर या ठिकाणी दिसुन आली. त्यानंतर सदरच्या महीलेबाबत अधिक माहिती काढली असता तीचे नाव आरीफा मुराद व्यापारी वय ५२ रा. जुन्नर येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सदरच्या महीलेच्या नातेवाईकांकडे चौकशी केली असता तीच्या डोक्यावर परिणाम झाला असल्याचे तीच्यावर उपचार चालु असल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच सदरची महीला कोणास काहीएक न सांगता घराचे बाहेर पडुन कोठेतरी गेली असल्याचे नातेवाईकांनी सांगितले. सकाळी ती कोणास काहीएक न सांगता ११:०० वा. च्या आसपास नेतवड या ठिकाणी आली होती. नेतवड या ठिकाणी सदरची महिला त्यांच्या नातेवाईकांना दिसली . नातेवाईकांनी स्वतः लाल रंगाच्या स्विफ्ट गाडीत घेवुन तीला परत जुन्नर या ठिकाणी घेवुन गेले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

### पारनेर तालुका क्रीडा समितीची निवड,ज्येष्ठांची व तरुणांची सांगड



पारनेर (समर्थ गांवकरी)

शालेय शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सालातील होणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धांच्या नियोजनासाठी पारनेर तालुका क्रीडा समितीची सहविचार सभा नुकतीच पार पडली. तालुकाध्यक्ष बापूराव होळकर यांच्या अध्यक्षतेखाली न्यू इंग्लिश स्कूल पारनेर या ठिकाणी पार पडलेल्या सहविचार सभेमध्ये तालुकास्तरावरील विविध खेळांच्या ठिकाण व तारखांची माहिती देण्यात आली.

तसेच चालू वर्षीच्या तालुका क्रीडा समितीची निवड यावेळी करण्यात आली. तालुकाध्यक्ष बापूराव होळकर यांनी ज्येष्ठ व तरुण क्रीडा शिक्षकांचा मेळ घालून सर्व संमत्तीने नवीन समिती नियुक्त केली. यावेळी तालुक्यातील सर्व माध्यमिक, उच्च माध्यमिक व इंग्लिश मेडीयम व आश्रमशाळेतील क्रीडा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना तालुकाध्यक्ष बापूराव होळकर म्हणाले की, यावर्षी होणाऱ्या स्पर्धांचे नियोजन आयोजकांनी वेळेवर करून स्पर्धा व्यवस्थित व वेळेवर पार पाडाव्यात. जर काही अडीअडचणी आल्या तर त्याची माहिती तालुका क्रीडा समितीला देण्यात यावी. याप्रसंगी सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक सुनील गायकवाड हेही उपस्थित होते. सेवानिवृत्ती बद्दल त्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सुत्रसंचालन ऋषिकेश औटी यांनी केले तर आभार उपाध्यक्ष गंगाधर खोडदे यांनी मानले अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख लतिक राजे यांनी दिली.

नवनियुक्त क्रीडा समिती

अध्यक्ष - बापूराव होळकर, उपाध्यक्ष - गंगाधर खोडदे, रावसाहेब व्यवहारे, भिकाजी गरकळ, कार्याध्यक्ष - ऋषिकेश औटी, सचिव - बबन शिंदे, सहसचिव - दत्ता मांडगे, खजिनदार - महेंद्र गायकवाड, सहखजिनदार - मयूर रोहोकले, कुशल संघटक - राधुजी चौधरी, जिल्हा संघटक - रामसेतू आवारी, महिला प्रतिनिधी - मंदा रासकर, पंच कमिटी - अक्षय शिंदे, सोमनाथ अनंत, प्रसिद्धी प्रमुख - लतिफ राजे मार्गदर्शक - शरद केदारे यांची एक मताने निवड केली.

### नगर शहरात नेता सुभाष चौकात पोलिसावर हल्ला

#### कोतवाली पोलिसात गुन्हा दाखल

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

नगर शहरातील नेताजी सुभाष चौकात रविवारी रात्री मिरवणुकीदरम्यान कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला धक्काबुक्की करत सरकारी कामात अडथळा आणल्याची घटना घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कॉन्स्टेबल अनुप शेखर झाडबुके (वय ३०, रा. सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी सुनील शंकर करांदे (रा. लक्ष्मी कारंजा, अहिल्यानगर) आणि त्याच्या इतर तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माळीवाडा ते सर्जेपुरा मार्गावर निशान मिरवणूक सुरू असताना रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. मिरवणुकीची परवानगी वेळ संपत असल्याने साध्या वेशातील पोलीस कॉन्स्टेबल अनुप झाडबुके व त्यांचे सहकारी वाहतूक सुरळीत करत होते. झाडबुके यांनी हिंदवी शौर्य वाद्य पथकातील सदस्यांना मिरवणूक पुढे नेण्यास सांगितले. याचा राग येऊन सुनील करांदे व त्याच्या तीन साथीदारांनी झाडबुके यांच्याशी वाद घालत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली.

# डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीला आता कायमस्वरूपी दिलासा

## उड्डाणपुलाचा मार्ग मोकळा; पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या डीएसपी चौकातील कोंडीचा प्रश्न आता कायमस्वरूपी मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. शहराच्या वाढत्या वाहतुकीचा आणि भविष्यातील गरजांचा विचार करून डीएसपी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या कामाला गती मिळाली असून, या प्रकल्पासाठी ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने तसेच आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण प्रकल्प पुढे आला आहे.

कोपरगाव-शिर्डी-कोल्हार-अहिल्यानगर या प्रमुख मार्गावरील डीएसपी चौक हा शहरातील वाहतुकीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. संभाजीनगरकडून येणारी वाहने तसेच शिर्डी, कोपरगाव, कोल्हार आणि शहराच्या विविध भागांकडे जाणारी वाहतूक या चौकातून मोठ्या प्रमाणावर होते. वाढत्या वाहनसंख्येमुळे विशेषतः सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत या ठिकाणी मोठी कोंडी होत होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने काही मिनिटांचा प्रवास पूर्ण करण्यासाठी नागरिकांना बराच वेळ वाहतुकीत अडकून राहावे लागत होते. परिणामी, वेळ आणि इंधनाचा अपव्यय होण्याबरोबरच रोजच्या प्रवासाचा ताणही वाढत होता.

शहराच्या दैनंदिन वाहतुकीशी निगडित हा प्रश्न लक्षात घेऊन डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. शहराचा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता भविष्यातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा उभारण्याची गरज त्यांनी मांडली. त्यांच्या पाठपुराव्याला पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

डीएसपी चौकातील प्रस्तावित उड्डाणपुलासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या प्रकल्पाला आता प्रत्यक्ष अंमलबजावणीची दिशा मिळाली आहे.

उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर डीएसपी चौकातील मुख्य वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. शिर्डी, कोपरगाव, कोल्हार तसेच अहिल्यानगर शहराच्या विविध भागांकडे जाणाऱ्या वाहनांना अधिक सुरळीत मार्ग उपलब्ध होईल. परिणामी, चौकातील कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होणार आहे.

डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीचा परिणाम केवळ वाहनांच्या रांगांपुरता मर्यादित नव्हता. या कोंडीत अडकणाऱ्या नागरिकांचा वेळ, इंधन आणि श्रम खर्ची पडत होते. कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी, रुग्णवाहिका तसेच शहराबाहेर प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा दररोज सामना करावा लागत होता. त्यामुळे उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर अहिल्यानगरकरांच्या रोजच्या प्रवासातील वेळ आणि त्रास कमी होणे हा या प्रकल्पाचा सर्वात मोठा परिणाम ठरणार आहे.

अहिल्यानगर शहराचा विस्तार वेगाने होत असून, वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि शहराला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांवरील वाहतूक लक्षात घेता भविष्यातील गरजांसाठी पायाभूत सुविधा सक्षम करणे आवश्यक झाले आहे. त्या दृष्टीने डीएसपी चौकातील उड्डाणपूल हा केवळ सध्याची वाहतूक कोंडी कमी करणारा प्रकल्प नसून, अहिल्यानगर शहराच्या पुढील अनेक वर्षांच्या वाहतूक व्यवस्थेचा विचार करून उचललेले महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.



वर्षानुवर्षे डीएसपी चौकातील कोंडीचा त्रास सहन करणाऱ्या नागरिकांसाठी उड्डाणपुलाच्या मंजुरीमुळे आता मोठा दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून, आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती मिळाली आहे.

अहिल्यानगर शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पासाठी निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार, अशी भावना डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली. शहराच्या वाढत्या गरजा आणि भविष्यातील वाहतुकीचा विचार करून शासनाने घेतलेला हा निर्णय अहिल्यानगरच्या विकासाला अधिक गती देणारा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## देवळाली प्रवरा येथे १३ सप्टेबरला आण्णासाहेब कदम प्रतिष्ठानच्या वतीने कांदा उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन

राहुरी (समर्थ गांवकरी)




देवळाली प्रवरा येथील आण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्रामविकास प्रतिष्ठानच्या वतीने १३ सप्टेंबर रोजी कांदा उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन केल्याची माहिती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आली.

कृषी , ग्रामविकास या माध्यमातून ग्रामविकासाचे काम करणाऱ्या देवळाली प्रवरा येथील आण्णासाहेब कदम पाटील प्रतिष्ठानने दि . शेतकऱ्यांसाठी प्रतिष्ठानच्या ग्राम विकास केंद्र ( लक्ष्मण बाग ) येथे १३ सप्टेबर रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत कांदा उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे . यात माजी कृषी सहसंचालक शिवाजीराव जगताप व महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कृषी रोग शास्त्रज्ञ चिमाजीराव बाचकर हे मार्गदर्शन करणार आहेत.

या तंत्रज्ञान प्रशिक्षणामध्ये एस पी ॲग्रो नी बनवलेले आधुनिक कांदा लागवड यंत्र प्रशिक्षणाच्या वेळी प्रत्यक्ष यंत्र व माहिती उपलब्ध करण्यात येणार आहे . या प्रशिक्षणासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करून सहभागी व्हावे , असे आवाहन कदम प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात अवैध गुटखा-मावा विक्रेत्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

## अकोले, राजूर, कर्जत, श्रीरामपूर व श्रीगोंदा येथे एकाचवेळी १० छापे; २ लाख ७६ हजार ८९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील अवैध गुटखा, मावा व सुगंधित तंबाखूच्या विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने जोरदार मोहीम हाती घेतली आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने अकोले, राजूर, कर्जत, श्रीरामपूर शहर आणि श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाचवेळी १० ठिकाणी छापे टाकून कारवाई केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पाच पथके तयार करून जिल्ह्यात अवैध गुटखा, मावा व सुगंधित तंबाखूची विक्री करणाऱ्यांची माहिती संकलित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दिनांक ४ व ५ सप्टेंबर २०२६ रोजी पथकांनी विविध ठिकाणी कारवाई केली.

या धडक कारवाईत २० आरोपींविरुद्ध १० गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण २ लाख ७६ हजार ८९६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये काही आरोपी फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

अकोले येथे ३५ हजार १४० रुपये, राजूर येथील दोन कारवायांमध्ये अनुक्रमे १२ हजार ६७० व २ हजार ६३८ रुपये, कर्जत येथील तीन कारवायांमध्ये ४ हजार २०,



१० हजार ७०० व ३५ हजार ९०० रुपये, श्रीरामपूर शहरातील दोन कारवायांमध्ये ८५ हजार ३०० व ३ हजार १४४ रुपये, तर श्रीगोंदा येथील दोन कारवायांमध्ये १४ हजार १०४ व ७३ हजार २८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये बीएनएस कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच लागू असलेल्या ३(५) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या पथकांनी केली. जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात यापुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांच्या या मोहिमेतून स्पष्ट झाले आहे.

# नाहुली विविध कार्यकारी सेवा सोसायटीला जिल्हा बँकेचे सभासत्व; कर्ज वाटपाचा मार्ग मोकळा

## विधानपरिषद सभापती आमदार प्रा. राम शिंदे यांच्या आदेशाने प्रशासक मंडळाने घेतला निर्णय

जामखेड (समर्थ गांवकरी)

नाहुली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची नोंदणी सप्टेंबर २०२२ मध्ये झाल्यानंतर तत्कालीन संचालक मंडळाने संस्थेला सभासदत्व न देता कर्जवाटपापासून वंचित ठेवले होते, परंतु बँकेत संचालक मंडळाची मुदत संपल्यामुळे प्रशासक लागल्या नंतर संस्थेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सचिन घुमरे यांनी विधानपरिषद सभापती राम शिंदे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला त्यामुळे प्रशासक यांनी संस्थेला सभासद करून कर्ज वाटप करण्यास मंजुरी दिली.

प्रशासक मंडळाच्या या निर्णयामुळे नाहुली परिसरातील शेतकरी आणि सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. सोसायटीला जिल्हा बँकेचे सभासत्व




मिळावे आणि कर्ज वाटपाची परवानगी मिळावी यासाठी आमदार प्रा. राम शिंदे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या खंबीर पाठपुराव्यामुळेच संस्थेला ही मंजुरी मिळाली आहे. बँकेकडून कर्ज वाटपाची परवानगी मिळाल्यामुळे आता नाहुली सोसायटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पीक कर्ज, मध्यममुदती कर्ज आणि इतर कृषीपूरक योजनांसाठी अत्यंत सुलभतेने अर्थसाहाय्य उपलब्ध होणार आहे. या महत्त्वपूर्ण यशामुळे नाहुली

> लवकरच विधानपरिषद सभापती आमदार राम शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये नाहुली गावातील व परिसरातील शेतकऱ्यांना कर्ज वाटपाचा कार्यक्रम घेऊन चेक वितरण करण्यात येणार आहेत.

सोसायटीच्या संचालक मंडळाने व संस्थेचे संस्थापक चेअरमन सचिन घुमरे यांनी विधानपरिषद सभापती आमदार प्रा. राम शिंदे यांचे विशेष आभार मानले आहेत. तसेच सर्व स्तरांतून सोसायटीचे अभिनंदन केले जात आहे. जिल्हा बँकेने दाखवलेल्या विश्वासामुळे संस्थेच्या माध्यमातून सभासदांना अधिकाधिक पारदर्शक आणि जलद सेवा देण्याचा आमचा मानस आहे, असा विश्वास सोसायटीच्या व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

## भगवान श्री वीर गोगादेव जन्मोत्सव मिरवणुकीत वीज खंडित -हिंदू समाजात संतप्त

### गणेशोत्सव काळात भारनियमन करू नये -विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाची मागणी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भगवान श्री वीर गोगादेव यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित मिरवणुकी प्रसंगी सायंकाळी ७ ते १०.३० या कालावधीमध्ये वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या आहेत.व हिंदू समाजाच्या वतीने तीव्र संतप्त व्यक्त केला जात आहे.

या मिरवणुकीत मोठ्या संख्येने हिंदू समाज एकत्रित येत असतो. तसेच महिला व माता-भगिनींचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो.वीज पुरवठा खंडित झाल्याने ही मिरवणूक अंधाराच्या छायेखाली पार पडली. हिंदू सण उत्सवाच्या काळात धार्मिक मिरवणुका प्रसंगी महावितरण विभागाने (चडएऊउड)वीज पुरवठा खंडित करू नये,अशी मागणी वीज महा महामंडळाचे अति.कार्यकारी अभियंता सुभाष घाटोळ



यांना निवेदनाद्वारे देण्यात आली.याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे अर्चक, पुरोहित, आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, सहप्रमुख हरिभाऊ डोळसे,मनोहर भाकरे,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर आदी उपस्थित होते. तसेच येणारा गणेशोत्सव बारा दिवस असल्याने मोठ्या प्रमाणात धार्मिक पूजा-विधी व सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.या कालावधीमध्ये श्री गणेशाच्या आगमनाच्या दिवशी शहरात मोठ्या प्रमाणात मिरवणुकीचे आयोजन करण्यात येते.

# शिक्षक शाळेत विद्यार्थ्यांची संस्कारीत पिढी घडवितात- ॲड. पांडुरंग गायकवाड

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शाळेतून विद्यार्थ्यांची संस्कारित पिढी शिक्षकच घडवितात म्हणून शाळांमधून दर्जेदार शिक्षणासाठी आधुनिक सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी समाजातील दानशूरांनी दान करण्याचे आवाहन जय मल्हार शिक्षण संस्थेचे सचिव एड.पांडुरंग गायकवाड यांनी केले आहे.

जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला त्यावेळी आयोजित कार्यक्रमात विद्यार्थी शिक्षक यांना मार्गदर्शन करताना एड. गायकवाड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक उंडे बी.आर.होते.शालेय अभ्यासक्रमा बरोबर विद्यार्थ्यांना शाळेतून आदर्श जीवनमूल्य,व्यक्तिमत्व विकास, किशोरवयीन कौशल्य विकास,आरोग्य संपन्नता,बुद्धिमत्ता विकास, जनरल नॉलेज इत्यादी बाबत संस्कारमय शिक्षणाचे धडे परिपाठ, स्पर्धा,चाचण्या घेऊन शिक्षक विद्यार्थ्यांची सुसंस्कारित पिढी घडविण्याचे आदर्श कार्य करीत आहेत. म्हणून विद्यालयातील सर्व शिक्षकांचा विद्यार्थ्यांकडून तसेच संस्थेकडून शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

विद्यालयाचे नवीन इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात चालू असून उर्वरित बांधकामासाठी शाळेचे शिक्षक, कर्मचारी, ग्रामस्थ, पालक,सामाजिक संस्था, व्यक्ती यांनी पुन्हा मदत करावी असे आवाहन एड.गायकवाड यांनी केले.विद्यार्थ्यांचे कौशल्य विकासासाठी उपक्रम शाळेने राबावेत अशा सूचनाही एड.गायकवाड यांनी केल्या. मोबाईलचे दुष्परिणाम या विषयावर शाळेत निबंध स्पर्धा घेण्यात आली .त्यामध्ये ४ विद्यार्थ्यांनी लिहिलेला उत्कृष्ट निबंधास बक्षिसे देण्यात आली. शाळेसाठी स्पोर्ट मॅट दान देण्याचे दातृत्व ग्रामस्थ भास्कर घुले यांनी जाहीर केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या गुणगौरववार




भाषणे केली. जरांगे सर, केदारी सर, वाळून सर,मुख्याध्यापक उंडे सर व मा. मुख्याध्यापक सुंबरे सर यांची भाषणे झाली. गरकळ सर,मा.पोलीस अधिकारी बाबाजी जगताप, भास्कर घुले ,शिवाजी उमाप, विकास घुले,संतोष घुले,नारायण पुंडे,गौरी जगताप,पंडित बाई इत्यादी जण कार्यक्रमात उपस्थित होते.